मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

# हितगुज

**अंक ८८ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ डिसेंबर २०११**

**वेबसाईट : www.maratheprathishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in**

**(फक्त खाजगी वितरणासाठी)**

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना सप्रेम नमस्कार

सन २०११च्या सरत्या वर्षातील हा 'हितगुज'चा अंक प्रकाशित होत आहे. रविवार दिनांक २५ सप्टेंबरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थिती चांगली राहिली म्हणून मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाला समाधान वाटले. आता पुणे येथे दिनांक २५ डिसेंबरला भरणाऱ्या कुलसंमेलनालाही मोठ्या संख्येने उपस्थित राहा.

या अंकात 'आप्पासाहेब मराठे : एक असामान्य आणि उत्तुंग व्यक्तिमत्व' हा लेख त्यांचे पुतणे (वय वर्ष ८०) श्री. शंकर कृष्णाजी मराठे, नाशिक यांनी अतिशय परिणामकारक, प्रामाणिकपणे लिहिला आहे. तो वाचून आपलीही मान अभिमानाने ताठ होते की इतकी कर्तबगार व्यक्ती मराठे परिवारातील आहे. मराठे प्रतिष्ठानच्या बैठका मराठे उद्योग भवनात होतात ही स्वर्गीय आप्पासाहेबांची कृपा अशी भावना होऊन आप्पासाहेबांनी केलेल्या कर्तबगारीपुढे मन नतमस्तक होते. आप्पासाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या पुतण्याने प्रकृती बरी नसतानाही हा लेख लिहिला म्हणून कृतज्ञता व्यक्त करते. समस्त मराठे परिवाराद्वारा स्वर्गीय आप्पासाहेबांना अभिवादन.

याशिवाय 'संन्याशाची करामत' हा पर्यावरणविषयी लेख, 'सुहासिनी' हे ललित-गद्य, कै. नारायणराव मराठे यांच्यावरील मृत्यूलेख, प्रभाकर मराठे या साहित्यिकाचा परिचय, आयुष्याचे सोने करणाऱ्या सौ. शीलाताई वामन मराठे यांच्यावरील

### ✻ निमंत्रण ✻

पुणे येथे २१ ते २५ डिसेंबर २०११ या कालावधीत चित्पावन फाउंडेशनतर्फे औद्योगिक प्रदर्शन भरवले जाणार आहे. त्याला जोडूनच मराठे प्रतिष्ठानचा वर्धापनदिन व कुलसंमेलन आयोजित केले आहे. यामध्ये विविधरंगी आकर्षक कार्यक्रमांचा आपल्याला आस्वाद घेता येईल. तरी पुण्यातील व पुण्याबाहेरील जास्तीत जास्त कुलबांधवांनी सहभागी व्हावे ही विनंती. अद्याप आपण नोंदणी केलेली नसली तरी अजूनही करू शकता.

**दिनांक : रविवार दिनांक २५ डिसेंबर २०११**

**स्थळ : महालक्ष्मी सभागृह येथील आदित्य हॉल<br>२३१, पर्वती, मित्रमंडळ कॉलनीजवळ<br>पुणे ४११ ००९**

**वेळ : सकाळी ९ ते दुपारी ४**

**शुल्क : प्रत्येकी २५०/- (दोनशे पन्नास फक्त) यामध्ये सकाळचा नाष्टा, चहा, दुपारचे जेवण व दुपारचा चहा यांचा समावेश आहे.**

ता.क. : खास युवकांसाठी फेसबुकवर मराठे परिवाराचा ग्रुप बनवला आहे. त्याचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घेऊन त्यात सहभागी व्हावे ही विनंती.

**सौ. नीलांबरी मराठे, पुणे**
**संपर्क : ९४०४२४१७६१**

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा (पू.), मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३१११९०२ ◆

मुलाखतवजा लेख वाचनीय आहेत.

आई हे विधात्याच्या प्रतिभेला पडलेले एक मधुर स्वप्न आहे. सृजनाची देवता मानवीसृष्टीत आईच्या रूपाने प्रकट झाली. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' अशा या आईला 'आठवणीतल्या गुजगोष्टी' या लेखातून सौ. विद्या दळवी यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. श्री. मीनानाथ मराठे यांनीही 'आई'वर मृत्यूलेख लिहिला आहे. याशिवाय वाचकांचा पत्रव्यवहार, सहवेदना, मानसन्मान, कविता इत्यादी मजकुराचा समावेश 'हितगुज'मध्ये केला आहे.

सर्व मराठे परिवाराला नूतन वर्ष सुखासमाधानाचे, समृद्धीचे आरोग्यसंपन्न जावो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करते.

- आपली शुभचिंतक

**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)**
८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

**२५ नोव्हेंबर २०११**

# नाही कसला ताठा

विख्यात संगीतकार, कवी, गीतरचनाकार, गायक श्री. यशवंत देव यांच्या वाढदिवसांच्या कार्यक्रमात श्री. भाऊ मराठे यांनी निवेदन केले. त्यावेळी यशवंत देव यांनी भाऊ मराठेंवर उत्स्फूर्त कविता केली. हितगुजच्या वाचकांसाठी ती प्रकाशित करीत आहे.

*रसिकांची ही भाऊगर्दी*

*त्यात वेगळे भाऊ*

*त्यांच्या मार्मिक संवादामध्ये*

*चला रंगूनी जाऊ*

*सर्व कलाकारांशी भाऊ सुरेख जुळवी मेळ।*

*कंटाळा कधी येतच नाही असा रंगला खेळ*

*कुशाग्र बुद्धी सवे निरीक्षण*

*तरी बोलणे गोड।*

*भाऊंच्या प्रेमळ धक्याला नाही जगात नाही तोड।*

*त्यांच्या स्मरणांजली असती विविध किश्यांचे साठे।*

*नाही कसला ताठा यांचे नाव जरी मराठे।।*

**- कवी यशवंत देव**

# आप्पासाहेब : एक असामान्य आणि उत्तुंग व्यक्तिमत्व

**श्री. शंकर कृष्णाजी मराठे (पृ. ३९९), नाशिक**

''आप्पासाहेब''

''एक फार फार मोठे व्यक्तिमत्व''

त्यांचे मूळ नाव सखाराम पुरुषोत्तम मराठे. जन्म स्थळ : वेंगुर्ले, जि. रत्नागिरी, १८ जून सन १९११.

मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झालेवर मुंबई येथे P.Shah & Co. या दुकानात नोकरीला सुरुवात केली.

काही वर्षांनी सदर कंपनीच्या मालकानी, कराची-सिंघ येथे शाखा स्थापन केली. व तेथे आप्पासाहेबांची मॅनेजर म्हणून नेमणूक करून त्यांना कराचीला पाठविले. ही कंपनी मोटर बस बॉडीला लागणारी फिटिंग्ज, रेक्झीन क्लॉथ, वॉटरपुफ्र कॅनव्हास, कुशन स्प्रिंगज वगैरे वस्तूचा विक्री व्यवसाय करीत आहे. आप्पासाहेबांच्या कुशल मार्गदर्शनामुळे तो धंदा भरभराटीला येऊन, काही वर्षातच ते स्थिरस्थावर झाले.

वरीलप्रमाणे या क्षेत्रात चांगला जम बसलेवर आप्पासाहेबांनी खालीलप्रमाणे अन्य उद्योग-व्यवसाय सुरू केले.

१. Fairdeal Pharmacy या नावाने केमिस्ट दुकान काढले व अल्प काळात नावारूपाला आणले.

२. The Sind Industrial & Pharmacecutical या कंपनीची स्थापना केली. या कंपनीचे मुख्य ऑफिस कराची शहरात होते व फॅक्टरी, कराचीचे उपनगर 'मलीर' येथे उभारली. ही कंपनी 'SIPCOL' या ब्रँड Shark Liver Oil नावाने या व्हीटामीनयुक्त औषधाचे उत्पादन करीत असे. हे प्रॉडक्ट बनविण्यामागची थोडक्यात कथा अशी आहे -

त्या काळात COD LIVER OIL या नावाचे व्हिटामिनयुक्त औषध परदेशांतून भारतात मोठ्या प्रमाणात आयात होत असे. त्यावेळी दुसरे महायुद्ध (2nd world war) जोरात चालू होते. त्यामुळे या औषधाची आयात बंद झाली व ते मिळेनासे झाले, पण मागणी तर खूप होती. आप्पासाहेबांनी ही परिस्थिती नेमकी हेरून, आपल्या देशात हे बनविले पाहिजे असा निग्रह केला व त्या दृष्टीने हालचालीला सुरुवात केली. खूप खटपट, अभ्यास व सर्वे केला असता असे लक्षात आले की भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर जामनगर, पोरबंदर, ओखा वगैरेच्या सागरक्षेत्रांत शार्क नावाचे मोठ्ठे मासे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत व त्याचे तेल हे परदेशातून आयात होणाऱ्या COD Liver Oil इतकेच गुण संपन्न आहे. या प्रमाणे कराचीतील मलीर येथील फॅक्टरीत Shark Liver Oil SIPCOL या ब्रँड नावाने सुरू केले. उच्च दर्जाच्या गुणवत्तेमुळे या प्रॉडक्टचा खप ही दिवसेंदिवस वाढत होता. आप्पासाहेबांच्या समर्थ नेतृत्वाखाली सर्व धंदे भरभराटीत, छानदारपणे चालले होते.

कराचीला सुमारे २०हजार महाराष्ट्रीयन वस्ती होती. 'ब्राह्मण सभा', 'कराची महाराष्ट्र मित्र मंडल' वगैरे सामाजिक संस्था होत्या. काही शिक्षण संस्था व त्यांची हायस्कूल होती. या प्रत्येक संस्थेशी आप्पासाहेबांचा निकटचा संबंध होता. उद्योगधंद्यात व्यस्त असूनही ते या सार्वजनिक कामांना वेळ देत असत. त्यामुळे आप्पासाहेबांच्या सल्ल्यासाठी व मार्गदर्शनासाठी कार्यकर्त्यांचा आमचेकडे राबता होता. मी त्या वेळेला शालेय विद्यार्थी १२ ते १६ वर्षे वयोगटातला होतो. माझे बरेचसे माध्यमिक शिक्षण कराची येथील N.J.V. High School (नारायण जगन्नाथ वैद्य हायस्कूल) येथे झाले. आप्पासाहेबांना एक मुलगा व एक मुलगी - नावे सुरेश व विमल. (सुरेश म्हणजे नंतरच्या काळात प्रसिद्ध असलेले यशस्वी उद्योगपती व 'मराठे प्रतिष्ठान'चे संस्थापक आधार-स्तंभ, श्री. सुरेशभाऊ मराठे) सुरेशभाऊंची मुंज कराची येथे ब्राह्मण सभा हॉलमध्ये झाली. मला आप्पासाहेबांनी वेंगुर्लेहून कराचीला नेले. ते माझे सख्खे चुलते - पण त्यांना आम्ही 'काका' असे कधीच म्हटले नाही. सुरेश, विठ्ठल, आम्ही सर्व नातेवाईक, आप्तेष्ट व त्यांचा विशाल मित्र परिवार. यामध्ये ते 'आप्पासाहेब' या नावानेच ओळखले जात.

मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनने, मराठे उद्योग भवन, प्रभादेवी येथील रस्त्याला 'आप्पासाहेब मराठे मार्ग' असेच नाव दिले आहे.

सर्व काही ठाकठीक सुरळीतपणे चालू असताना, १९४७ च्या ऑगस्टमध्ये आपल्या भारत मायभूमीची फाळणी झाली. कराची-सिंध पाकिस्तानात समाविष्ट झाले. व सर्वच चित्र बदलले... उत्तर भारतातून मुख्यत्वे पंजाबमधून मुस्लिमांचे लोंढेच्या लोंढे कराचीत येऊन थडकू लागले. त्यांना मिळालेल्या पाकभूमीत हिंदू नको होते. हे मुस्लिम Refugee होऊन जसे पाकिस्तानात आले, त्याचप्रमाणे येथील हिंदू प्रजेने भारतात निघून जावे अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे हिंदू कुटुंबावर हल्ला करणे, खून, मारामाऱ्या, हिंदूच्या मालमत्तेची नासधूस, आगी लावणे व नंतर नंतर तर दररोज लुटमारीचे प्रकार नित्य घडू लागले. दिवसेंदिवस तिथे राहणे आम्हास अशक्य झाले व म्हणून आप्पासाहेबांनी आम्हा सर्वांस मुंबईस पाठविण्याचा निर्णय घेतला. सप्टेंबर १९४७ मध्ये आम्ही म्हणजे माझ्या सौ. काकू (आप्पासाहेबांच्या पत्नी) सुरेश, विमल व मी कराचीहून बोटीने मुंबईस आलो. त्यावेळी १६ वर्षांचा मी, तर सुरेश-विमल अगदीच बाल वयाची होती. तो जलप्रवास म्हणजे एक दिव्यच होते. एक महान कटू अनुभव होता. माणसे व त्यांचे सामान - Luggage याने बोट खचाखच भरलेली होती. बायका, मुले, तरुण, वयस्कर, अतिवृद्ध सर्वच होते. मराठी, सिंधी, गुजराती व इतर हिंदू बांधव! वर्षोवर्षांचा संसार, घरदार सोडून, थोडेफार सामान घेऊन दुःखद अंतःकरणाने निघाले होते. सर्वजण निर्वासित, समदुःखी. आम्ही Luggageच्या ढिगाऱ्यावर कसेबसे बसून कराची ते मुंबई प्रवास केला. एकंदर परिस्थिती भयानक होती. त्यावेळचे स्मरण झाले की अजूनही अंगावर काटा उभा राहतो. मुंबईत काही दिवस राहून नंतर आम्ही वेंगुर्ल्यास घरी गेलो.

आम्ही सुखरूप आलो, पण आप्पासाहेब तिकडेच होते. तात्कालिक निघणे शक्य नव्हते. खूप मोठा पसारा होता. तो आवरण्यासाठी खंबीर मनाने तिकडे राहिले व सर्व मालमत्तेचे रूपयी दोन आणे हाती आले ते स्वीकारून जानेवारी १९४८ मध्ये मुंबईत सुखरूपपणे आले. ते सुरक्षित मुंबईस आल्याने आम्हा सर्व कुटुंबीयांना त्या वेळच्या चमत्कारिक संक्रमण अवस्थेतही आनंद झाला. ईश्वरीकृपा!

**आता पुढे काय? पुनश्च हरी ॐ!**

मुंबईत आलेवर त्यांनी Sachin & Co. स्थापन केली. त्याचे ऑफीस २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-१ येथे थाटले. सरकारी खात्यांना लागणारे निरनिराळे साहित्य - मुख्यत्वे इंजिनिअरिंग क्षेत्रांतले, पुरवठा करण्याचे काम या कंपनीद्वारे सुरू केले. अल्पकाळात Approved Government Suppliers म्हणून ते नावारूपाला आले. या शिवाय मुंबईचे क्रॉफर्ड मार्केटनजीक लोहार चाळीध्ये V. Ramesh & Co. या नावाचे Hardware & Tools चे दुकान होते. त्यांचेकडेही आप्पासाहेब भागीदार म्हणून सामील झाले. ब्रांदा येथे एक Work shop शेड घेऊन शासनाला लागणाऱ्या काही वस्तूंचे उत्पादन सुरू केले. स्वत:चे प्रॉडक्ट म्हणून, जहाजाला लागणाऱ्या Ship Lightsचे ते एकमेव उत्पादक होते असे म्हणायला हरकत नाही.

Swifts Pvt. Ltd.ची स्थापना केली. व Rallies (I) Ltd या कंपनीची एजन्सी घेतली. रॅलीज कंपनीचे फॅन्स व 'WOH' Brand Electric Hand Tools त्या जमान्यात खूप प्रसिद्ध होती. या कंपनीचे त्या वेळेला ऑफिस. प्रभादेवीचे सुप्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिराचे बाजूला 'सिद्धिविनायक सोसायटी'मध्ये Shop No.1 येथे होते. (कर्मधर्म संयोगाने मी सहकुटुंब याच सोसायटीमध्ये पहिल्या मजल्यावरच्या ब्लॉकमध्ये गेली ५०-५५वर्षे सन २०१० पर्यंत राहत होतो.)

दरम्यान पोर्तुगीज चर्च या संस्थेकडून प्रभादेवी भागातील एक प्लॉट मिळवून, आप्पासाहेबांनी तिथे सध्या उभी असलेली भव्य 'मराठे उद्योग भवन' ही दिमाखदार वास्तू निर्माण केली. उद्योग भवनमध्ये इंजिनिअरिंग फॅक्टरी स्थापून "Premier Automobiles", "TELCO", "Philips", "Mahindra" वगैरे महाकाय कंपन्याकडून त्यांना लागणाऱ्या, असंख्य Spare Partsच्या ऑर्डर्स मिळवून त्याच्या उत्पादनाला जोरदार सुरुवात झाली. कंपनीची भरभराट होऊन स्थिरस्थावर झाले. दरम्यान त्यांचे सुपुत्र श्री. सुरेशभाऊ पूर्णवेळ कामकाज पाहू लागले. व त्यानंतर आप्पासाहेबांच्या यशोगाथेचा अतिउच्च टप्पा म्हणजे :

"Swift offset Printing Machine" ची निर्मिती त्यांनी World Class दर्जाचे मशीन बनविले. अखिल भारतीय स्तरावर किंबहुना परदेशातही प्रसिद्धी मिळाली. अनेक पुरस्कार मिळाले. व एक धडाडीचा अत्यंत यशस्वी उद्योगपती म्हणून अजरामर झाले. मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनने 'मराठे उद्योग भवन' असलेल्या रस्त्याला 'आप्पासाहेब मराठे मार्ग' असे नाव देऊन त्यांचा कायमचा यथोचित गौरव केलेला आहे.

**"Swift offset Printing Machine"**

१९६५च्या आसपास आप्पासाहेब मराठे उद्योग भवन या वास्तूत वास्तव्यदेखील करू लागले. पुढे एक-दोन वर्षांत त्यांना असे वाटू लागले की आपण दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वत:चे असे काहीतरी उत्पादन (own product) करावे. त्यावेळी ऑटोमॅटिक इलेक्ट्रिक या कंपनीचे संस्थापक श्री मधुकर भट त्यांच्या, संपर्कात आले व त्यांनी आप्पासाहेबांना प्रतिरूप मुद्रण यंत्राची (Offset Printing Machine) कल्पना सुचवली. त्यावेळी भारतात अशाप्रकारची निर्मिती कोणीच करत नव्हते आणि संपूर्णपणे आयातीवर अवलंबून राहावे लागत होते. आप्पासाहेबांनी लगेच या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी पाऊले उचलली व १९६८-६९ साली त्याचे Prototype तयार झाले. परंतु दुर्दैवाने २८ ऑगस्ट १९६९ रोजी आप्पासाहेबांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने, वयाच्या अवघ्य ५८व्या वर्षी देहावसान झाले.

पुढील एक-दोन वर्षांत सुरेशभाऊंनी त्या कल्पना प्रत्यक्षात आणून 'स्विफ्ट' हे भारतातील पहिले उत्पादित प्रतिरूप मुद्रण यंत्र म्हणून बाजारात आणले. गुणवत्ता आणि तत्पर सेवा यामुळे त्याला भारतीय स्तरावर तसेच परदेशातही प्रसिद्धी मिळाली. भारत सरकारनेदेखील त्याची दखल घेऊन कंपनीला आयात पर्याय पुरस्कार (Import Substistution Award) देऊन सन्मानित केले.

मराठे उद्योग समूहाची मुहूर्तमेढ ठेवणारे आप्पासाहेब अत्यंत यशस्वी उद्योगपती म्हणून अजरामर झाले. मुंबई महानगरपालिकेने देखील मराठे उद्योग भवन असलेल्या रस्त्याला 'आप्पासाहेब मराठे मार्ग' असे नाव देऊन त्यांचा कायमचा यथोचित गौरव केलेला आहे.

**- श्री. शंकर कृष्णाजी मराठे (पृ३९९)**
'ओंकार' बंगला, ताज रेसिडेन्सीच्या समोर,
पाथर्डी फाटा, प्रशांतनगरच्यापुढे, नाशिक ४२२ ०१०
फोन : ९३५०८०५६५२

## हितगुज राखीव फंड निधी

श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे, (पृ. ३३६), मुलुंड यांनी त्यांच्या आईवडिलांच्या स्मरणार्थ (आई कै. इंदिरा आत्माराम मराठे, वडील कै. आत्माराम विनायक मराठे) देणगी दिली आहे. तसेच भाऊबीजेच्या स्वरूपात त्यांनी देणगी दिली आहे. त्याचप्रमाणे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीतील सदस्य श्री. चिंतामण म. मराठे (पृ.२२२) लालबाग यांनी पितरांच्या स्मरणार्थ देणगी दिली आहे. श्री. वामन शंकर मराठे ज्वेलर्स, ठाणे (पृ२७७), श्रीमती सुहासिनी नारायण मराठे (पृ१८), श्री. नरहरकृष्ण मराठे, ठाणे, सौ. रेखा चितळे (मराठे), रत्नागिरी, प्रकाश विद्वांस (पृ.६४५), अहमदाबाद, दिनकर रामचंद्र मराठे (पृ,१६९), गिरगाव, माधवी मुकुंद मराठे, ठाणे, श्री. अशोक यशवंत विद्वांस, कल्याण

**विशेष सूचना :** हितुगज राखीव फंड निधी, देणगी शक्यतो चेकद्वारो 'मराठे प्रतिष्ठान' नाव लिहून संपादिकेच्या पत्त्यावर पाठवावी. मराठे प्रतिष्ठानाला देणगी दिल्याबद्दल आभार.

# सौ. शीलाताई मराठे : आयुष्याचे सोने करणाऱ्या समाजसेविका (पृ. २७७)

सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ. १२०)

यशस्वी पुरुषांच्या मागे एक स्त्री असते, असे म्हणणारे कित्येक असतील... पण आमचे यश आमच्या घरातील स्त्रीनेच उभे केले आणि हे सर्व तिचेच, असेच... अभिमानाने सांगणारे एक कुटुंब आपल्या परिवारात आहे ते म्हणजे सौ. शीलाताई वामन मराठे यांचे ठाण्यातील एकत्र कुटुंब.

### बालपण व शिक्षण

शीलाताईंचा जन्म २३ डिसेंबर १९३६ला रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर तालुक्यात असलेल्या सागवे या गावी झाला. त्यांचे वडील कृष्णाजी वि. सोमण हे विख्यात ज्योतिषी होते. दा. कृ. सोमण हे त्यांचे भाऊ आहेत. गावात सातवीनंतर शिक्षणाची सोय नसल्यामुळे पुढे मुंबईला शिक्षण झाले. सातवी म्हणजे फायनलची परीक्षा त्या पास झाल्यामुळे मधे तीन वर्षांचा कालावधी सोडून एकदम एस.एस.सी.ला (मॅट्रीक) बसता येणार असल्यामुळे दरम्यानच्या काळात इतर कोर्स केले. शिवणाची आवड असल्यामुळे शिवणाचा डिप्लोमा पूर्ण केला. त्याचवेळी म्हणजे १९५१च्या दरम्यान राष्ट्रभाषा हिंदीचा प्रचार फार जोराने चालू होता म्हणून हिंदी राष्ट्रभाषा प्रविण, पंडीत त्यानंतर शिक्षक सनद व भाषा रत्न ह्या क्रमाक्रमाने पदव्या प्राप्त करून हिंदीच्या क्लासमधून त्या शिकवू लागल्या. कारण त्यावेळी ऑफिसमधून प्रत्येकाला हिंदीच्या परीक्षा देणे अनिर्वाय होते.

दिनांक १२ मे १९५६ला वयाच्या १९व्या वर्षी त्यांचा विवाह वामनरावांबरोबर झाला. त्याचवर्षी त्या प्रथम श्रेणीत एस.एस.सी पास झाल्या. पुढच्या शिक्षणासाठी वामनरावांनी व त्यांच्या आईवडिलांनी शीलाताईंना प्रोत्साहन दिले. मराठी विषय घेऊन द्वितीय श्रेणीत बी.ए. पास झाल्या. १९६७मध्ये हिंदी विषय घेऊन एम.ए. (एस.एन.डी.टी)केले.

### समाजसेवा

डॉ. बेडेकर हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून त्यांनी हिंदी-मराठी विषय शिकविले. राष्ट्रभाषा हिंदी परीक्षांच्या वर्गांना विनामूल्य मार्गदर्शन केले. शैक्षणिक क्षेत्रात शीलाताईंनी भरीव कार्य केले. १९७५साली नगरपालिकेत शिक्षण समितीच्या त्या सभापती असताना पालिकेने बालवाड्या सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी संमत करून घेतला. आणि बालवाड्यांची संख्या वाढू लागली. त्याचप्रमाणे नगरपालिकेच्या शाळेतून सातवी पास झालेल्या मुलाला खाजगी हायस्कूलमध्ये प्रवेश मिळणं कठीण होऊ लागलं तेव्हा नगरपालिकेचीच हायस्कूले असावीत म्हणजे ही अडचण होणार नाही व त्यामुळे या वर्गातील मुलांना शिक्षणापासून वंचित राहावं लागणार नाही, यासाठी त्यांनी अक्षरश: खूप प्रयत्न केले आणि त्यात त्यांना यश मिळाले. मुळात शिक्षणाची आच असल्यामुळे त्यांना विद्यार्थ्यांच्या अडचणी समजल्या. नगरपालिकेच्या इतिहासात ही अभूतपूर्व कामगिरी केली ती शीलाताई मराठे यांनीच.

१९७२ पासून शीलाताईंनी जनसंघाच्या कार्याला सुरुवात केली. कै. रामभाऊ म्हाळगी हे त्यांचे प्रेरणास्थान. रामभाऊंच्या आग्रहावरून त्या 'महिला आघाडीच्या' प्रमुख झाल्या. आणि महिलांचे अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. खेडोपाडी जाऊन स्त्री ही शक्ती आहे. तिचा आदर करायला पाहिजे. तिची उपेक्षा-हालअपेष्टा करता कामा नये म्हणून व्याख्याने देऊन प्रबोधन केले. 'प्रेरणा उद्योग' या महिला संचालित केंद्राची स्थापना शीलाताईंनी केली. त्यातून गरजू महिलांकडून उत्तमोत्तम घरगुती पदार्थ करवून त्यांना विक्री केंद्रातून आर्थिक प्राप्ती मिळवून दिली. महिला सुरक्षासमितीच्या कार्यातही त्यांनी लक्ष घातले. त्यांच्या कार्याची पावती म्हणून १९७४ साली जनसंघाच्या तिकिटावर नगरसेविका म्हणून त्या निवडून आल्या. १९७४ ते १९८१ पर्यंत त्यांनी नागरिकांची नि:स्वार्थपणे खूप सेवा केली. रस्ते, दिवे, स्वच्छता इ. वॉर्डातील कामांत लक्ष पुरविले. पोखरण येथे गुलाबाची सुंदर बाग करून घेतली. लोक अजूनही त्यांना नगरसेविका समजतात. व त्यांच्याकडून आपली कामे करून घेतात. त्यांच्या नि:स्वार्थ सेवेमुळे महानगर-पालिकेतही त्यांना मान मिळतो. नगरसेवकाने निवडणूक लढविण्याचे क्षेत्र 'वॉर्ड' समजावे. पण कार्याचे संपूर्ण नगर समजावे असे त्या मानतात व त्यानुसारच सर्व शहरातील लोकांच्या



**भाजपचे ज्येष्ठ नेते माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांनी ज्ञानदेव मंडळाला सदिच्छा भेट दिली.**

कल्याणार्थ झटतात. अशा वृत्तीमुळेच सर्व नागरिक त्यांना मान देतात.

कै. श्याम फडके यांच्याबरोबर ठाण्यातील 'बालरंगायन' या संस्थेच्या त्या कार्यकर्त्या व कोषाध्यक्ष होत्या. ह्या संस्थेच्या बालनाट्याच्या तालमी, सभा शीलाताईंच्या घरीच होत असत. हिमगौरी आणि सात बुटके मधील बुटक्यांचे व अन्य कलाकारांचे पोशाख शीलाताईंनी स्वत: शिवले होते. त्यांनी स्वत: महिला मंडळाच्या नाटकांतूनही कामे केली आहेत. राज्य नाट्य स्पर्धेच्या परीक्षक म्हणूनही त्यांची निवड झाली आहे.

कथाकथन हा त्यांचा आवडता छंद आहे. आतापर्यंत पन्नासच्यावर कथाकथनाचे कार्यक्रम त्यांनी केले आहेत. कवठेकरांची 'तिळाच्या वड्या' या कथाकथनाला त्यांना स्पर्धेत पहिला नंबर मिळाला होता. शीलाताई उत्तम वक्त्या असल्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या व्याख्यात्या म्हणून कोकणातील चारी जिल्ह्यांत त्यांची ५००च्यावर व्याख्याने झाली आहेत. लार्सन अँड टुब्रो या कंपनीतर्फे चंद्रपूरला 'अवरपूर' येथे व रायपूरच्या 'हिरमी' या ठिकाणी व्याख्याने झाली. कामगारांना व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर प्रबोधन करतात.

ज्ञानेश्वर माऊलीच्या संजीवन समाधीला ७००वर्षे झाली. पहिल्या वर्षी पंढरीची पायी वारी करून आल्यावर जो आनंद अनुभवला तो इतरांनाही मिळावा म्हणून त्यांनी 'पाऊले चालती पंढरीची वाट' ह्या विषयावर १०८ व्याख्याने देण्याचा संकल्प सोडला. पुणे, सातारा, वाई, नाशिक येथे वसंतव्याख्यानमालेत त्यांची व्याख्याने झाली.

कथालक्ष्मी, ललना, मनोहर अशा मासिकांमधून त्यांनी कथालेखन, प्रवासवर्णने लिहिली आहेत. आकाशवाणीवर, दूरदर्शनवर त्यांचे कार्यक्रम झाले आहेत. संपूर्ण दक्षिण भारत, चारधाम, अंदमान, अमरनाथ, परदेशप्रवास भरपूर केला आहे. त्यांचे पती वामनरावांचा साठावा वाढदिवस त्यांनी नायगरा धबधब्याच्या साक्षीने साजरा केला आहे.

परंतु, व्याखान्याच्या दृष्टीने सर्वाधिक आनंद देणारा कृतार्थ क्षण कोणता? तर आळंदी व पंढरपूर मंदिरात दिलेली व्याख्याने असे त्या भारावून जाऊन सांगतात.

**श्री ज्ञानदेव सेवा मंडळाच्या संस्थापिका**

१९७३साली एकमेव आदर्श असे ज्ञानदेव मंदीर पाचपाखाडी, ठाणे येथे दानशूर देणगीदारांमुळे - वामनराव, अण्णा परचुरे, दत्तोपंत शिंदे यांच्या अथक परिश्रमातून साकार झाले. ज्ञानराज सभागृह, मुक्ताई महिला मंडळ, निवृत्तीनाथ सभामंडप, सोपान नेत्ररुग्णालय याद्वारे विविध उपक्रम, समाजसेवा, आरोग्यशिबिरे राबविली जातात. शीलाताई या ज्ञानदेव सेवा मंडळाच्या संस्थापिका आहेत. व्याख्यानाद्वारे मिळणारे मानधन, परीक्षक म्हणून मिळणारे सर्व मानधन शीलाताई श्री ज्ञानदेव सेवा मंडळास देतात.

**पंढरपूरची वारी**

श्री. वामनराव व सौ. शीलाताई या दोघांनी वीस वर्षे पायी चालत पंढरीची वारी केली आहे. 'स्वत:ला विसरायचे असेल, खोटे मुखवटे गळून पडायचे असतील, भक्तीमार्गाचा अत्युच्च आनंद लुटायचा असेल तर 'पंढरीची वारी' एकदा तरी करावी असे त्या म्हणतात. दिंडीत सहभागी झालेला एखादा वारकरी जरी निरक्षर असला तरी माणुसकीचे मूल्य तो जतन करताना दिसतो. आराम, सुख घरात आहेच. दिंडीत भौतिकसुखाचा अभाव असला तरी ज्ञानेश्वर माऊलीच्या भक्ती प्रेमाचा पूर ओसंडून वाहात असतो त्यामुळे थकणे, दमणे, आजार जाणवत नाही असे शीलाताईंना वाटते. एकदा वारीत चालत असताना मुळात गोऱ्यापान, नाजूक असलेल्या शीलाताई उन्हात चालून चालून त्यांचा चेहरा लाल झाला. हे पाहून एका वारकरी आजींना त्यांची सहानुभूती वाटली न राहून त्या शीलाताईंना म्हणाल्या, 'तुमच्यासारख्याने पायी का बरे चालावे? तुम्ही तर गाडीतून प्रवास करायला पाहिजे. हे बघ झाडं सगळीकडेच असतात. काही झाडं माळरानावर वाढतात, काही कुंडीत वाढतात. कुंडीतल्या झाडांना आपण पाणी घालतो, सावलीत ठेवतो, निगा राखतो, जपतो. तसं तुमचं पण आहे.'' समजुतीच्या सुरात ती शीलाताईंना समजावून देत होती.



**पंढरपूरच्या आरोग्यदिंडीत एका वारकरी महिलेला औषध पाजताना सौ. शीलाताई**

**राजकारणातून दूर होताना समाजकारणाचे विशिष्ट क्षेत्र निश्चित करून त्यात आदर्शवत कामगिरी करणारे मोजकेच लोक आहेत. त्यापैकी एक म्हणजे सौ. शीलाताई मराठे. ठाण्याच्या स्थानिक राजकारणात ठसा उमटविणाऱ्या शीलाताईंनी राजकारणातून समाजकारणाकडे कसे वळता येते हे दाखवून दिले आहे. त्यांच्या कामाबद्दल सार्वजनिक आदर आहे. राजकारणात आमदार, खासदार, मंत्री झाल्या नाहीत. नगरसेविकाच राहिल्या, कारण राजकारणात पैशापुढे ध्येयवादाला शून्य किंमत असते हे त्या जाणून होत्या म्हणून कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना नागरिकांच्या तक्रारी दूर करण्याचे काम स्वत: जातीने पाहिले.**

### कारसेवा

अयोध्येला राममंदिर बांधण्यासाठी आंदोलन झाले तेव्हा कारसेवा करण्यासाठी शीलाताईही आंदोलनात उतरल्या. तेव्हा ५०० कारसेवकांना ताब्यात घेतले. शीलाताईंनाही अयोध्येत उतरू न देता जालवना जिल्ह्यात अटक केले. आठ दिवस त्या अटकेत होत्या. ६ डिसेंबरला अयोध्येत काही कारसेवक पोचले आणि 'ढाचा गिर गया' हे पाहिल्यावर शीलाताईंना कार्यपूर्ती झाल्यासारखे वाटले.

### पुरस्कार

सेवाभावी, नि:स्पृहपणे कार्य करणाऱ्या शीलाताई आजही या वयात अनेक संस्थामधून कार्यरत आहेत. त्यांना कामाचा प्रचंड उरक आहे. गेल्यावर्षी ठाणे येथे भरलेल्या साहित्य संमेलनात भोजनप्रमुख पदाची जबाबदारी त्यांनी चोखपणे सांभाळली. मराठी ग्रंथसंग्रहालयात त्या उपाध्यक्ष तर पीपल्स एज्युकेशन सोसायटी, न्यू इंग्लिश स्कूलच्या शाळेच्या व इतर अनेक समाजसेवी संस्थामध्ये सन्माननीय कृतीशील सदस्य आहेत. शीलाताईंनी केलेल्या कार्याची नोंद या संस्थांनी घेतली आहे. त्यांना समाजरत्न पुरस्कार, नवदुर्गा पुरस्कार, आदर्श दाम्पत्य, रोटरीतर्फे समाजसेविका पुरस्कार असे अनेक पुरस्कार देऊन गौरविले आहे.

### गोकुळी नंदनवन फुलले

आज शीलाताई मराठ्यांच्या घरात चार पिढ्या एकत्र सुखासमाधानाने राहात आहेत. एकत्र कुटुंबपद्धती जी आज विरळ होत चालली आहे ती ईश्वरकृपेने त्यांच्याकडे आहे. पणजी म्हणून, आजी म्हणून, सासू म्हणून, आई, पत्नी, वहिनी म्हणून साऱ्या भूमिका शीलाताईंनी शोभिवंत केल्या आहेत. स्त्रीजीवनात गृहिणी हे पद आदर्शपणे त्यांनी जपलं आहे. घरच्या गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या गोकुळात राहतानाही सामाजिक बांधिलकीचा ध्यास त्यांना आहे, नव्हे समाजासाठी काम करणे हेच त्यांचे ध्येय आहे.

आपले नाव सार्थ करणाऱ्या शीलाताई सोने, चांदी, हिरे यांचे दुकान असणाऱ्या श्रीमंत घरात कर्तृत्वाने, गुणाने श्रीमंत झाल्या, त्याहीपेक्षा समृद्धीच्या जोडीने मनानेही त्या श्रीमंत झाल्या. समस्त मराठे परिवाराला त्यांचा अभिमान वाटेल.

**- सौ. शीलाताई वामन मराठे**
**(पृ.२७७)**
'कैलास', विष्णूनगर, गल्ली नं.२,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२
फोन : ०२२-२५४२२८८३
**शब्दांकन : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**
**(पृ.१२०)** संपादिका

## प्राचीन ग्रंथ ''शुकबाहात्तरी''

एकोणीसाव्या शतकात प्रसिद्ध झालेल्या एका ग्रंथाची अस्सल प्रस्तावना वाचकांच्या पुढे मांडली आहे. हा प्राचीन ग्रंथ-कथासंग्रह म्हणजेच ''शुकबाहात्तरी'' ह्या नावाने प्रसिद्ध झाला होता. त्या कालखंडात छापखान्यांची नुकतीच सुरुवात झाली असावी कारण ग्रंथ हस्तलिखित तयार करून नंतर त्याचे छपाईकाम त्या काळातील प्राप्त तांत्रिक पद्धतीने केले आहे. मला वाटते मराठी साहित्याचा अभ्यासूंना ग्रंथाची प्रस्तावना वाचून आपल्या छापील साहित्याची पूर्व स्थिती कशी होती व आता किती प्रगत झाली आहे ह्याचा अभ्यास करण्यासही मदत होईल.

ग्रंथ १५०वर्षांपूर्वी तयार केला आहे. त्याची अस्सल एक आवृत्ती उपलब्ध आहे, परंतु खूपच जुना असल्याने त्यातील काही कथांचे काही भाग प्राप्त नाहीत. (फाटले आहेत.) तरीही बव्हंशी कथा (३-४सोडल्यास) जुन्या हस्तलिखित छापकामात उपलब्ध आहेत. मूळ प्रस्तावना खाली देत आहे. ती येणेप्रमाणे -

(शके १७७० किलकनाम संवत्सरी म्हणजेच सन १८४९ श्री. विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांनी आपल्या छापखान्यात 'शुकाबाहात्तरी' ह्या नावाने एकूण ७२ कथांचा संग्रह छापून खास त्यांना आश्रय देणाऱ्या मंडळींसाठी प्रसिद्ध केला. ग्रंथाची प्रसिद्धी व छपाई मुंबई मुक्कामी झाली.

मूलत: ह्या कथासंग्रहात सत्तरच कथा होत्या. त्या संग्रहाचे नाव 'शुकबाहात्तरी' असे होते. परंतु त्यावेळी आद्यतांच्या दोन कथा घेऊन 'शुकबाहात्तरी' हे प्रसिद्ध नाव ठेवले. आणि हा ग्रंथ श्री नरसिंहशास्त्री शेजवलकर यांचे साहाय्याने परम प्रीतीने व आदराने सर्वांस निवेदन केला.

या ग्रंथातील कथा युक्तीच्या, मनोरंजन करणाऱ्या, चमत्कारिक व रमणीय आहेत. कथा वाचल्यावर कुणी असे म्हणेल की या ग्रंथातील गोष्टीत व्यभिचार प्रयुक्त युक्ती आहेत. यास्तव हा ग्रंथ वाचणाऱ्याच्या घमबुद्धीस कदाचित विरोध करील, परंतु ह्याचे तुलनेत म्हणणे आहे की, भागवतादी ग्रंथात नाना प्रकारच्या कथा आहेत. परंतु त्याचे पर्यवसान चांगल्या सिद्धांती आहे म्हणूनच ते ग्रंथ श्रवणीय होत. त्याचप्रमाणे 'शुकबाहात्तरी'तील कथाही शुकाने कोणी एक प्रभावती नामक स्त्रीस व्यभिचारापासून निवृत्त करण्यासाठी सांगितल्या आहेत. त्याप्रमाणे त्या स्त्रिची दुष्कर्मापासून विरक्तीही झाली आहे. यास्तव या ग्रंथाचा ओघ धर्माकडेसच आहे आणि याचा वक्ता शुकही मोठा धर्मात्मा होता. हे त्यातच लिहिले आहे म्हणूनच हा ग्रंथ मान्य आहे. या ग्रंथाचे पठण केल्याने मनोरंजन तर होईलच पण त्याचबरोबर संकट प्राप्त झाले असता त्याचा परिहार कसा करावा या विषयीच्या युक्तीही समजतील व अनुषंगाने लौकिकाचे ज्ञानही होईल.

या देशातील अभिवृद्धी इच्छिणारे लोकांनी केवळ ह्या ग्रंथातील हस्तदोषच निवडून उगीच दोष देवू नये कारण ग्रंथकर्त्यास श्रम पडतो तसा दोष ठेवणारास पडत नाही हीच वाचणाऱ्यास प्रार्थना आहे.)

**- सदाशिव ब. मराठे (पृ.३८०)**
मराठे वाडा, शास्त्री लेन, 'अन्नपूर्णा' कोठी चार रस्ता, वडोदरा (गुजराथ) ३९० ००१. फोन : २४२३०५५/२४२८६१८

# चतुरस्त्र व्यक्तीमत्व हरपले : कै. नारायण मराठे (पृ.१८), कल्याण

**अधिवक्ता : श्री. सुरेश पटवर्धन**

कै. नारायणराव मराठे 'मराठे प्रतिष्ठान'च्या सभांना अनेक वेळा त्यांच्या कार्यबाहुल्यातून वेळ काढून येत असत. प्रतिष्ठानला मार्गदर्शन करीत असत. मराठे परिवारावर त्यांचा विशेष लोभ होत. 'हितगुज'च्या ७५व्या प्रकाशनसमारंभालाही उपस्थित होते. 'हितगुज'चे अंक चांगले निघतात तेव्हा संपादिका म्हणून ते अनेकदा अभिनंदन करीत. दिनांक ३० ऑगस्ट २०११ला हरितालिकेच्यादिवशी त्यांचे दुःखद निधन झाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा नारायणरावांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कार्याचा परिचय देणारा लेख प्रकाशित करीत आहोत.

**- संपादिका**

कल्याणचे माजी नगराध्यक्ष आणि सिडकोचे माजी अध्यक्ष नारायणराव मराठे यांचे बुधवार ३१ ऑक्टोबरला कल्याण येथे त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले. कै. नारायणराव हे चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचे होते. सार्वजनिक जीवनात काम करीत असताना त्यांनी अनेक क्षेत्रे पादाक्रांत केली आणि त्या त्या क्षेत्रात समर्पित भावनेने योगदान करीत आपला ठसा उमटविला. कल्याण शहरावर आणि कल्याणच्या परिसरावर त्यांचे निरतिशय प्रेम होते.

कल्याण शहराच्या जडणघडणीतील अनेक महत्त्वाच्या गोष्टींमध्ये कै. नारायणरावांचा सिंहाचा वाटा होता. मुंबई परिसरातील इतर अनेक उप-नगराप्रमाणे कल्याण शहराचादेखील प्रचंड विस्तार झाला आहे असे असले तरी कल्याणात अजूनही गावकी टिकून आहे. कल्याणने आपले गावपण टिकवून ठेवले आहे असे कै. नारायणरावांच्या बोलण्यात नेहमी येत असे. ह्या टिकवलेल्या गावकीचे कै. नारायणराव हे महत्त्वाचे घटक होते. गावातल्या कोणत्याही सामाजिक उपक्रमाचे प्रसंगी नारायणरावांची उपस्थिती हवीहवीशी वाटत असे.

दि आदर्श सहकारी ग्राहक संस्था मर्यादित आणि महिला सहकारी उद्योग मंदिर मर्यादित ह्या दोन सहकारी संस्थांनी एकत्र येऊन आग्रा रोडवरील नमस्कार मंडळासमोरच्या जागेत संयुक्त प्रकल्पाचे बांधकाम करावयाचे ठरविले होते. भूमीपूजन कै. नारायणरावांच्याहस्ते झाले होते. आज त्या ठिकाणी इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन भव्य वास्तू उभी आहे. गावातल्या काही मंडळींनी ज्ञानेश्वर



पारायण समिती स्थापन करून ह्या समितीद्वारे ज्ञानेश्वरी पारायण सोहळा करावयाचे ठरविले होते. कै. नारायणराव समितीचे अध्यक्ष झाले होते. पारायणाचा सर्व सोहळा दिमाखदारपणे आणि भव्य प्रमाणात साजरा झाला होता.

कै. भास्करबुवा बखले यांच्यासारख्या विख्यात गानसम्राटाच्या स्मरणार्थ स्थापन झालेल्या आणि गायन, वादन, नृत्य इ. सर्व संगीत प्रकारांमध्ये निष्ठेने कार्य करून अखिल भारतीय कीर्तीच्या कलाकारांमध्ये मानाचे स्थान मिळवणाऱ्या कल्याण गायन समाजाचे अध्यक्षपद त्यांनी सुमारे बारा वर्षे भूषविले. वयाची ८१वर्षे पूर्ण झाल्यावर व्यक्तिगत सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा केला जातो, पण गायन समाजाचा सहस्त्रांद्रदर्शन सोहळा साजरी करण्याचा आगळी वेगळी संकल्पना नारायण-रावांचीच. २००७ या वर्षी कल्याण गायन समाजाचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा दिमाखदार पद्धतीने साजरा झाला. त्यांच्याच कारकिर्दीत गायन समाजाने गेली दहा वर्षं देवगंधर्व महोत्सवाचे आयोजन करून या महोत्सवाद्वारे अनेक नामवंत कलाकारांच्या कलाविष्काराचा लाभ गायन समाजाने रसिकांना दिला आहे.

कल्याण शहरातल्या ऐतिहासिक आणि प्राचीन वास्तूंचे जतन, संरक्षण, संवर्धन होण्याकरिता स्थापन केलेल्या कल्याण हेरिटेज सोसायटीचे अध्यक्षपददेखील त्यांनी भूषविले. असे एक ना अनेक उपक्रम, या सर्वांमध्ये नारायणरावांचा सहभाग आपल्या उपक्रमात असावा असे संयोजकांना नेहमीच वाटत असे.

लोकप्रतिनिधी या नात्याने त्यावेळच्या नगरपालिकेत सतत अठरा वर्षे नगरसेवक व समित्यांचे अध्यक्षपदे भूषविली तर एक वर्ष नगराध्यक्षपद नारायणरावांनी भूषविले. एवढ्या प्रदीर्घ काळ लोकप्रतिनिधी असल्यामुळे कल्याण-मधील अशी कितीतरी घरे आहेत की, ते घरांमधील प्रत्येक कुटुंबीय व्यक्तीशी नारायणावांचा व्यक्तिगत परिचय असे. ह्या अशा जवळकीमुळेच कोणताही प्रसंग मग तो सणसमारंभ असो वा तणावाचा असो. 'नारायणरावांना बोलवा' हा परवलीचा शब्द ठरून गेलेला असे. नारायणराव आले म्हणजे आता सर्व काही व्यवस्थित होईल असा एक विश्वास रहिवाश्यांमध्ये असे.

पक्ष कार्यकर्ता असो किंवा सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ता असो, नारायणराव हे कार्यकर्त्यांचे प्रेरणास्त्रोत होते. एखाद्या कामाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ते योग्य पद्धतीने व शिस्तीमध्ये

झाले पाहिजे, त्यामध्ये कोणताही ढिसाळपणा नसावा. असा त्यांचा नेहमी आग्रह असे. कार्यकर्त्यांमध्ये मिळून मिसळून, त्यांच्या खांद्यावर हात ठेवून कार्यकर्त्यावर पूर्ण विश्वास त्यांचे बरोबर काम करणे हे नारायणरावांचे वैशिष्ट्य असे.

नारायणरावांना खणखणीत आवाजाचे आणि उत्तम वक्तृत्वाचे वरदान लाभले होते. जाहीरसभा असो किंवा कार्यकर्त्यांचा मेळावा असो, समोरच्यांशी संवाद साधत निरनिराळी मासलेवाईक उदाहरणे देत उपस्थितांना ते आपलेसे करत असत. त्यांच्या भाषणात जुन्या कल्याणमधील व्यक्ती अथवा संस्था ह्यांच्या आठवणी हमखास असत. स्वत: हाडाचे कार्यकर्ते असल्यामुळे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यात जिव्हाळा असे. कार्यकर्ता असो किंवा कोणीही सर्वसामान्य व्यक्ती असो त्यांच्या घराचा दरवाजा मदतीकरिता कायम उघडा असे. ते स्वत: एक उत्तम कबड्डीपटू होते तसेच चांगले नाट्य कलाकार होते. पूर्वीश्रमीचा जनसंघ व त्यानंतर भारतीय जनता पक्षाचे ठाणे जिल्ह्याचे चिटणीस म्हणून त्यांनी अनेक वर्षे जबाबदारी सांभाळली. संघटनेची उत्तम बांधणी त्यांनी केली होती. त्यांच्या नागरी संरक्षण दलातील उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रपती पदक देऊन त्यांना गौरविण्यात आले होते.

त्यांच्या निधनाने एक खानदानी नेतृत्व, समर्थ संयोजक आणि उत्तम प्रशासक काळाच्या पडद्याआड गेला आहे.

लेखक : अधिवक्ता श्री. सुरेश पटवर्धन, कल्याण

प्रेषक : **श्रीमती सुहासिनी नारायण मराठे (पृ.१८)**

मराठे वाडा, पारनाका, कल्याण

फोन : ०२५१-२२०६४६४

# आई

**कै. सौ. प्रमिला लक्ष्मण मराठे यांच्या २४ सप्टेंबर या स्मृतीदिनी पुत्राने व्यक्त केलेल्या भावना :**

पाहता पाहता आईला जाऊन एक वर्ष २४ सप्टेंबर २०११ ला होत आले. त्या निमित्ताने एक स्मरण वर्षदिनाकारण लिहीत आहे. 'आई' प्रत्येकालाच अतिप्रिय असते. प्रथम 'गुरू'सुद्धा तीच असते. तिने केलेले बालपणीचे संस्कार कदाचित पुसटसे होतील, पण पूर्णपणे नाहीसे कधीही होत नाहीत. तसेच तिने घेतलेला कष्ट, त्रास याची भरपाई कशानेच होऊ शकत नाहीत आणि मला तिच्या ऋणातच राहणं आवडेल.

माझ्या आईमध्ये आईपणाचे सर्व गुण तर होतेच, पण फार कष्ट सोसून तिने आम्हाला वाढवले. तिच्यामध्ये प्रचंड सोशिकता होती आणि तिने विशेषत: अखेरच्या १५ वर्षे प्रकृतीच्या कारणाने तिचे तोपर्यंत असलेल्या दैनंदिन कार्याक्रमात खूपच फरक पडला, तरी २००५पर्यंत ती मर्यादित स्वरूपात शिकवण्या घेत राहिली मात्र त्यानंतरच्या वाढत्या प्रकृती अस्वास्थामुळे हिंडूफिरू शकेना तेव्हापासून बहुतांशी काळ घरातच काढणे क्रमप्राप्त झाले. त्या काळामध्ये तिने कधी एकटेपण, कधी शारीरिक व्याधी तर कधी आर्थिक चिंता तर कधी घरामध्ये सुसंवाद नसणे असे विविध ताप व शेवटच्या दोन महिन्यांमध्ये तर खूपच प्रकारचे त्रास फारसा त्रास न देता सोसले हीच कौतुकास्पद गोष्ट आहे असं मला वाटतं. ती तीस वर्षे शिक्षणक्षेत्रात असल्याने कितीतरी विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवले, यथाशक्ती विविधप्रकारे, अनेकांना साहाय्यही केले. तिने तिच्या आईचीही सेवा ८२ ते १९८४ काळात घर, नोकरी इ. सांभाळून जिवापाड केली. तोच 'आदर्श' काही अंशी आम्हामध्ये निश्चितपणे आला असावा. ईश्वरकृपेने ती तिच्या अखेरच्या क्षणापर्यंत किंवा तासाभरापर्यंत पूर्णपणे कोणत्या सपोर्टसिस्टिमशिवाय शुद्धीमध्ये होती. सकाळी साडेसात वाजता ब्रेकफास्ट माझ्या हातून तर दहा वाजता चहा बहिणीच्या हातून घेतला गेला. एवढेच आमचे 'भाग्य' म्हणणे क्रमप्राप्त आहे. शेवटी एकच ओळ लिहून या लेखाचा समारोप करतो. कारण आज अखेर नित्यनेमाने रोज तिचे 'स्मरण' घडते. स्वामी तिन्ही जगाचा, आईविना भिकारी।

- **मीननाथ मराठे**, लोकमान्य नगर, पुणे

**खापरपणजोबा श्री.शिवराम अंताजी मराठे यांच्या पुण्यस्मरणार्थ यांच्या प्रेमळ स्मृतीस अभिवादन**

सी.ए. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१

सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**

# सहवेदना

कै. सौ. रोहिणी प्रकाश विद्वांस (पृ.६४५) यांचे दिनांक १२-१०-२०११ रोजी अहमदाबाद येथे दु:खद निधन झाले. त्या ६४वर्षांच्या होत्या. त्यांनी ३५वर्षे रिझर्व्ह बँकेत नोकरी केली होती. त्याचप्रमाणे त्यांना सामाजिक कार्याची आवड असल्यामुळे अनेक सामाजिक संस्थांतून त्यांनी कार्य केले होते. मराठे प्रतिष्ठानचे हितचिंतक आपले कुलबांधव श्री. प्रकाश गणेश विद्वांस यांच्या त्या धर्मपत्नी होत्या. सौ. रोहिणीताई अहेवपणी गेल्या. त्यांना सौभाग्य मरण आले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. रोहिणी प्रकाश विद्वांस यांना भावपूर्ण श्रद्धांजली. श्री. प्रकाश विद्वांस परिवाराच्या दु:खात मराठे प्रतिष्ठान सहभागी आहे.

# सुहासिनी

**सौ. मीना सदानंद मराठे (पृ.४१७)**

मुंबईच्या सिमेंटच्या जंगलातून थोडे लांब पण मुंबानगरीच्या समीप घर घेण्याचे ठरविले. गृहसंशोधन सुरू झाले. मुंबईच्या जवळचा जिल्हा म्हणजे रायगड, माझा रायगड जिल्हा. माझ्या माहेरची पाळंमुळं रायगड जिल्ह्यातील रेवदंडा, तालुका अलिबाग येथे रुजलेली असल्याने रायगड जिल्ह्याविषयी विशेष जिव्हाळा, संशोधन करता करता पनवेलला एक छान मनाला लोभून घेणारे घर सापडले.

दिवाणखान्यातून लांबवर दिसणारी हिरवीगार भातशेती, दूरवर दिसणारी माथेरानची डोंगरांची रांग, पूर्वाभिमुख असल्याने डोंगरामागून उगवणारा सूर्य, पक्ष्यांचा किलबिलाट सर्व काही मनाला प्रसन्न करणारे वातावरण. मी, अनुजा व सदानंद तिघेही या वास्तूच्या प्रेमात पडलो. घर घेण्याचे ठरविले व झटपट घेऊनही टाकले.

इमारत सातमजली पण राहण्यास आलेली बिऱ्हाडे फक्त दोनच. आमच्या मजल्यावर चार सदनिका पण तीन रिकाम्या. मजल्यावर फक्त आम्हीच. घर तर घेतले पण आता दुसरीच चिंता मनाला भेडसावू लागली. शेजारी कोण येतील? कसे असतील? मराठी भाषिक असतील की परभाषिक? बिल्डरकडे चौकशी केली असता, कळले की आमच्या समोरचा ब्लॉक, भाटे नावाच्या कुटुंबाचा आहे. चला, एक चिंता मिटली की हिंदू शेजारी आहेत. परत दुसरा प्रश्न मनात आला हे कुटुंब परदेशात राहते. खूप श्रीमंत असतील, आपल्याशी बोलतील का? हसतील का? कुटुंबात कितीजण असतील? कधी येतील? दार उघडून ओळख करून घेतील का धाडकन दरवाजा बंद करतील?

मला माणसं जोडण्याची खूप हौस त्यामुळे ह्या सर्व गोष्टींच्या मधमाशा डोक्यात घोंघावू लागल्या. गणपती बाप्पाची प्रार्थना केली. आमचे शेजारी चांगले असू देत, त्यांना लवकर भारतात येऊ देत म्हणजे आमचा परिचय होईल.

खरंच, बाप्पाने माझी प्रार्थना ऐकली. एके दिवशी पनवेलला पोहोचलो तर काय समोरच्या घराच्या खिडक्या-दारे उघडलेली दिसली. आतून बोलण्याचा आवाजही येत होता. घाबरत घाबरत दारावरची कडी वाजवली. घरातील गृहीणीने हसतमुखाने दार उघडले. मी माझा परिचय करून दिला. आम्ही समोरच्या ब्लॉकमध्ये राहतो असे सांगितले. त्या गृहिणीने प्रसन्न मुद्रेने आमचे स्वागत केले. आत बोलावून बसण्यास सांगितले. परस्पर परिचय झाला. तिचे शुभनाम होते 'जागृती'. तिचे पती प्रदीप व छोटी जीनल. अरे वा! आमच्या सारखेच सदानंद, मी व अनुजा. झालं आमचे पहिले त्रैराशिक जमले.

दिवसेंदिवस आमच्या मैत्रीचे रोप वाढू लागले. जागृती नावाप्रमाणे खरोखरच सर्व बाबतीत जागृत होती. ती गृहकृत्यदक्ष तर आहेच पण शिवणकाम, बागकाम, पाककला सगळ्यात निपुण आहे. पाहुण्यांचा आदर-सत्कार कसा करावा हे तर सर्व महिलांनी जागृतीकडून शिकावे. आम्ही पनवेलला गेल्यावर जागृती थंडगार पाणी, थंडगार शीतपेय. कोणतातरी नवा पदार्थ बनवून आमचे स्वागत करते. सदानंद एकटे पनवेलला गेले तर त्यांच्याबरोबर माझ्यासाठी ढोकळा, थेपला किंवा खाकरा, चंपाकळी सारखे विविध पदार्थ पाठविते. खरंच जागृती एक सुगरण आहे.

अनुजाच्या सासरच्या मंडळींचे स्वागत तिने वेलकम ड्रिंक व चायनीज स्टार्टरने केले. तेव्हा ती मंडळीदेखील चकित झाली. मी मात्र अभिमानाने म्हणू शकले की ही माझी शेजारीण नाही तर सख्खी शेजारीण आहे.

तिच्या वागण्या करण्यातून तिच्या आई-वडिलांनी केलेल्या संस्कारांचे दर्शन घडते. आदर्श गृहिणीचे लक्षण काय तर सुहासिनी - सुमधुर भाषिणी. आदर्शपणाचे गुण पुरेपूर तिच्यात आहेत. अशी आमची सुहासिनी - जागृती.


**- सौ. मीना सदानंद मराठे**

प्लॅट नं.४८६, ३२वा रस्ता,

बी राधानारायण, बांद्रा (प.) मुंबई ४०० ०५०

फोन :०२२-२६४५९५३०/ ६५७२३०४४


## हार्दिक अभिनंदन

श्री. निरंजन प्रभाकर मराठे व सौ. भक्ती निरंजन मराठे (पृ.१२०) यांना रविवार दिनांक १८ सप्टेंबर २०११ला कन्यारत्न प्राप्त झाले.

सोमवार दिनांक ७ नोव्हेंबर नामकरण समारंभ, ठाणे येथे ब्राह्मणसेवा संघात थाटमाटात साजरा झाला. बाळाचे नाव **'अनघा'** ठेवले. ज्ञानदेव सेवा मंडळाच्या संस्थापिका, समाजसेविका सौ. शीलाताई वामन मराठे (पृ.२७७) बाळाला शुभाशिर्वाद देण्यासाठी उपस्थित होत्या. यावेळी पणज्यांच्या डोक्यावर फुले उधळली गेली. पणजोबाही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. निरंजन व सौ. भक्ती ह्यांचे हार्दिक अभिनंदन. चि. अनघाला अनेकोत्तम शुभाशिर्वाद. (चि. अनघा ही संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांची नात आहे.)

**आपलं जीवन हे आपल्याच विचारातून, आचारातून निर्माण होत असतं.**

# एक प्रकाशझोत :
# श्री. प्रभाकर द. मराठे यांच्या साहित्यावर व त्यांच्या जीवनावर

प्रभाकर दत्तात्रय मराठे यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९४१ रोजी पुणे येथे झाला. १९६५पासून त्यांचे चिंचवड येथे वास्तव्य आहे. १९९३ पर्यंत त्यांची नोकरी चिंचवड येथील एका इंजिनिअरिंग कंपनीत तंत्रज्ञ म्हणून झाली. श्री. मराठे हे चिंचवडमधील एक ज्येष्ठ साहित्यिक आहेत.

आजवर श्री. मराठे यांची ३० कादंबऱ्या व दोन कथासंग्रह अशी एकूण ३२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ऐतिहासिक, सामाजिक, रहस्यप्रधान, प्रेमकथा अशा सर्व विषयात त्यांनी लेखन केले आहे. १९७० पासून लेखन करताना आजवर त्यांच्या तीन कादंबऱ्यांना व काही कथांना विविध स्पर्धांतून पुरस्कार प्राप्त झाले आहेत. कथा-कादंबरीशिवाय ललित लेख, नियतकालिकांतून स्फुट व नैमित्तिक लेखन, प्रबोधन कथा, याखेरीज जवळपास दोनशे कविता असे अन्य लेखनही त्यांनी आजवर केले आहे.

पिंपरी-चिंचवड भागात त्यांनी विविध साहित्य संस्कृती विषयक उपक्रमातही भाग घेतला आहे. १९८०-९० च्या दशकात 'पिंपरी-चिंचवड साहित्यसंघ' या नावाच्या संस्थेच्या कार्यात स्थापनेपासून सहभाग व त्या संस्थेच्या द्वारा अनेक साहित्यविषयक कार्यक्रमही आयोजित केले होते.

पिंपरी-चिंचवड मधील नागरिकात खगोलशास्त्राची रुची निर्माण व्हावी यासाठी मुंबईच्या 'खगोल मंडळ' नावाच्या संस्थेच्या सहकार्याने काही उपक्रमही दोन-तीन वर्षे केले.

'शुभदायिनी' या नावाच्या उपक्रमांतर्गत ते गरजूंना ज्योतिष्यविषयक मार्गदर्शन व वधुवर माहिती समन्वयासारखे सामाजिक कामही करत आहे.त याशिवाय 'एक व्यक्ती-प्रबोधन अभियान' या अभिनव संकल्पनेच्याद्वारे व्यक्ती संपर्काच्या प्रत्येक माध्यमातून सामाजिक आशय असलेल्या कुठल्याही विषयातील अगदी मरणोत्तर नेत्रदान, देहदानापासून जीवनाच्या सर्वच पैलूतील 'अंधार दूर ठेवा' पर्यंतचा प्रबोधन विचार व्यक्ती-व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न ते आजही अगदी सातत्याने करत आहेत.

गेली वीस वर्षे श्री. मराठे ज्योतिष्यशास्त्राचा अभ्यास करत आहेत. मराठी भाषेत, अधिकाधिक व विविध विषयातील ज्ञान उपलब्ध व्हावे या दृष्टीने विशेषत: विविध शब्दकोश पूर्ण केला आहे. सध्या ते तंत्रज्ञानावरील एक व वैद्यकशास्त्रावरील एक असे दोन शब्दकोश संपादन करण्याच्या कामात व्यस्त आहेत.

**श्री. प्रभाकर द. मराठे यांचा साहित्यक्षेत्रातील परिचय :**

ज्येष्ठ साहित्यिक श्री. प्रभाकर द. मराठे यांची 'वसुली' या नावाची लघुकथा पुण्याच्या साप्ताहिक 'स्वराज्य' मधून १९५७मध्ये प्रकाशित झाली. त्यानंतर १९६२मध्ये 'मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय' या संस्थेतर्फे आयोजित केलेल्या कादंबरी स्पर्धेत श्री. मराठे यांची 'एक क्षणाचा पक्षी' ही कादंबरी पहिल्या सात कादंबऱ्यात निवडली गेली. पुढे ही कादंबरी मुंबईच्या 'भारतीय ग्रंथ भवन'तर्फे १९६४मध्ये प्रकाशित झाली. त्यानंतरच्या काही वर्षांत श्री. मराठे कथालेखन व कविता करत होते. १९७२मध्ये मुंबईच्या 'दै.मराठा'तर्फे आचार्य अत्रे कथा-पुरस्कार स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत श्री. मराठे यांच्या 'अंधारपुत्र'या कथेस 'प्रथम पुरस्कार' मिळाला. नंतर पुन्हा एकदा पुण्याच्या वरदाबुक्स या प्रकाशन संस्थेतर्फे १९७५मध्ये कादंबरी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात ही श्री. मराठे यांच्या 'चंद्र वेचिले चांदणे' या कादंबरीस प्रथम पुरस्कार मिळाल

१९७६मध्ये सेनापती तात्या टोपे यांच्या जीवनावरील 'अग्निपथ' ही कादंबरी चिंचवड येथे क्रांतीवीर चाफेकर स्मृतीस्मारक स्तंभाच्या पायाभरणीच्या कार्यक्रमात श्री. मा. शरद पवार यांच्या हस्ते प्रकाशित झाली. त्याच वर्षी 'सूर्यधारात उभी मी' ही वेगळ्या विषयावरील आणखी एक कादंबरी प्रकाशित झाली. शिवाय काही निवडक कथांचा 'अंधारपुत्र' हा कथा संग्रह ही प्रकाशित झाला.

१९७७साली पुन्हा एकदा मुंबईच्या स्व.शरयू पाटील कादंबरी स्पर्धेत श्री. मराठे यांच्या 'अग्नियात्रा'या कादंबरीस चौथा पुरस्कार मिळाला. त्याच वर्षात 'राहिला अनंत पलीकडे' व 'पाय दारी आले' या दोन कादंबऱ्याही प्रकाशित झाल्या.

१९७८मध्ये पुण्यातील एक ज्येष्ठ प्रकाशक श्री. ह. अ. भावे यांनी श्री. मराठे यांच्यापुढे 'छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर पाच कादंबऱ्या लिहिण्याचा प्रस्ताव ठेवला. हा आव्हानात्मक प्रस्ताव स्वीकारून श्री. मराठे यांनी 'पुण्याची पहाट फुटे', 'रथ चालला पुढे', 'आणि आकाश पेटले', 'धैर्य समुद्र ढवळला' आणि 'शिवकल्याण राजा' अशा पाच कादंबऱ्या लिहिल्या. १९७८मध्ये 'शवयान' व 'एक नगर बुडाले' अशा आणखी दोन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

१९७९मध्ये 'अंधार गर्भ' व 'मन शुद्ध तुझं' या दोन रहस्यप्रधान कादंबऱ्या, 'तू क्षीरसागराचा धनी' ही एका वेगळ्या विषयावरील कादंबरी,

*(पुढील पानावर चालू)*

तर ‘सर्पकणीची सावली’ ही स्त्री जीवनातील दाहकता शब्दबद्ध करणारी, आणि ‘साथीला तूच हवा’ ही एक अत्यंत तरल काव्यात्म भावकथा या अशा पाच कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. १९८०मध्ये श्री. मराठे यांच्या कादंबऱ्यातील सर्वांत मोठी व महत्त्वाकांक्षी अशी कीर्तनकाराच्या जीवनावरची ‘भोवऱ्यात नाव माझी’ ही एकमेव कादंबरी प्रकाशित झाली.

१९८१मध्ये ‘लाक्षागृह’ व ‘अरण्यचंद्रिका’ या दोन विशेष लक्षणीय अशा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. १९८२मध्ये ‘ऐसे अरूपाचे रूप’ या कादंबरीबरोबरच निवडक कथांचां ‘पुतळे-पुतळे’ हा कथासंग्रहही प्रकाशित झाला. १९८३मध्ये ‘गगनवेध’ ही वेधशाळेच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी प्रकाशित झाली.

१९८५मध्ये ‘कोसेरा’ ही एक वेगळ्या प्रकारची कादंबरी पुण्याच्या ‘निहारा प्रकाशन’ तर्फे प्रकाशित झाली. ही श्री. मराठे यांची रौप्यमहोत्सवी कादंबरी होती. १९८६मध्ये ‘पाताळपाणी’ प्रकाशित झाली.

१९८७मध्ये ‘तो येऊन गेला’, ‘सती शिळेवर उभी’ आणि ‘एकांत स्वामी’ या आणखी तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. १९८९मध्ये श्री. मरों यांची तिसावी कादंबरी ‘प्रथम अध्याय’ प्रकाशित झाली.

कादंबरी लेखन चालू असतानाच श्री. मराठे यांचे ललित लेख, कविता, नैमित्तिक लेखन, स्फूट लेखन असे विविधांगी लेखनही चालू होतेच. चिंचवडचे श्री. मधु जोशी यांच्या साप्ताहिक चिंचवड दिनांक मधूनही ‘अंधेर नगरी’ नावाचे एक वेगळ्या स्वरूपाचे सदर ही काही दिवस चालविले. अलीकडे म्हणजे फेब्रुवारी २०००मध्ये ‘पुणे श्रमिक पत्रकार संघा’तर्फे आयोजित खुल्या लेखस्पर्धेत ‘पत्रकारितेकडून अपेक्षा आणि आक्षेप’ या विषयांवरील त्यांच्या लेखास मा. सीताराम येंच्युरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेला प्रथम पुरस्कार ही असाच लक्षणीय ठरला होता.

१९८९मध्ये त्यांची ‘प्रथम अध्याय’ ही कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर अगदी अनपेक्षितपणे लेखन क्षेत्रातील त्यांच्या कामाने एक वेगळेच वळण घेतले. त्यांनी ज्योतिष्यशास्त्रात अध्ययन, लेखन सुरू केले. आणि १९९८मध्ये ‘ज्योतिष महाशब्दकोश’ हा ज्योतिषशास्त्रावरील शब्दकोश त्या वेळचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. गोपीनाथजी मुंडे यांच्या हस्ते चिंचवड येथे प्रकाशित झाला. पुढे २००१मध्ये ज्योतिषविषयक ‘ज्योतिष दर्शक खगोल’ हे पुस्तक जोधपूरचे प्रख्यात ज्योतिषी डॉ. भोजराज द्विवेदी यांच्या हस्ते पुण्यात प्रकाशित झाले. आणि २००३मध्ये तर त्याच वैद्यकीय विषयावरील ‘रोगावकार महाशब्दकोश’ हा शब्दकोश प्रकाशित झाला. शिवाय ज्योतिषशास्त्रावरील आणखी दोन पुस्तके प्रकाशन प्रतीक्षेत आहेत. आणि आज २००६च्या प्रारंभीच श्री. प्रभाकर मराठे एका वेगळ्या विषयावरील पुस्तकाच्या जुळवाजुळवीच्या कामात व्यस्त आहेत.

## न्याय

*सांग कुठे तव न्याय । प्रभो मज सांग कुठे तव न्याय?*
*दिसतो मजला जागोजागी । विखुरला अन्याय ।।धृ।।*
*चराचराला तूच व्यापीशी । जलीस्थलीना तूची असशी*
*हाकेला मग का नचे येशी । का करिशी विश्राम ।।१।।*
*धनिकही रडतो पुत्रासाठी, गरिबांच्या ते असतीपोटी,*
*एकामागून एकाची येती घेऊनी, दारिद्र्याची रास ।।२।।*
*जगणे त्यांना असह्य होते । मरणाची जे वाट पाहते*
*परि नच त्यांच्या नशिबी येणे? काय उलटा हा न्याय ।।३।।*
*पुत्रवतीला करूनि निपुत्रिक । सधवाना त्या विधवा बनवून*
*अपमृत्यूचे दानही घेऊन? ---साधिसी काय ।।४।।*
*तव न्यायाचे कळेच ना गूढ । सूज्ञही जातो होऊनी दिग्मूढ*
*भव सागर हा तरण्या अवघड । घेई कसे तव नाम ।।५।।*
*प्रभो मज सांग कुठे तव न्याय?*

- **श्रीमती सुहासिनी नारायण मराठे (पृ.१८)**,
मराठे वाडा, पारनाका, कल्याण, फोन : ०२५१-२२०८४६४

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक २६ ऑगस्टला अध्यक्ष श्री. आनंदरावांच्या ठाणे येथील निवासस्थानी मराठे प्रतिष्ठानची बैठक झाली. सभेला उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, सौ. शुभाताई विद्वांस, श्रीमती सुलभाताई मराठे, सी. गो. खांबेटे, सुरेश मराठे, हेमंत मराठे, प्रभाकर व डॉ. सौ. सुमेधा मराठे, श्रीनिवास मराठे, विशेष आमंत्रित हितगुजचे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणराव मराठे इ. मंडळी उपस्थित होती.

श्रीनिवास मराठे यांच्या नातेवाईकांची पुण्याजवळील जागेविषयी चर्चा झाली. २५ सप्टेंबरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सादर केल्या जाणाऱ्या सौ. नीलांबरीताईंनी पाठविलेल्या पत्राविषयी विचारविनिमय झाला. पुणे शाखेचा वर्धापनदिन २६ जानेवारीला करायचा की २५ डिसेंबरला कारण चित्पावन फाउंडेशनतर्फे औद्योगिक प्रदर्शन पुणे येथे २१ ते २५ डिसेंबर या कालावधीत भरणार आहे. तेव्हा प्रदर्शनाच्या निमित्ताने अनेक कुलबांधव एकत्रित येण्याची शक्यता गृहीत धरून २५ डिसेंबरला पुणे येथे मराठे प्रतिष्ठानचा मेळावा घ्यायचे निश्चित झाले तसा दूरध्वनी नीलांबरीताईंना कार्यवाहांनी केला.

स्वादिष्ट अल्पोपहाराचा स्वाद अध्यक्षांनी केलेल्या आग्रहामुळे व सौ. नंदिनीवहिनींच्या आदरातिथ्यामुळे अधिकच रूचीपूर्ण झाला.

---

रविवारी २५ सप्टेंबरला वार्षिक कार्यकारिणीची सभा विठ्ठलमंदीर हॉल, दादर येथे सकाळी १०वाजता सुरू झाली. सभेला मोठ्या संख्येने कुलबांधवांची उपस्थिती होती हे सांगायला विशेष आनंद वाटतो. दिवगंतांना श्रद्धांजली वाहून सभा सुरू झाली. कार्यवाहांनी अहवाल, पत्रोत्तरे यांचे वाचन केले. आय-व्ययावर साधकबाधक चर्चा झाली. महत्त्वाचे निर्णय घेऊन त्यासंबंधी ठराव पास केले. श्री. गजानन मराठे, पुणे यांनी काही चांगले प्रश्न उपस्थित केले आणि त्यांच्या इनकमटॅक्समधील नोकरीच्या अनुभवाचा लाभ या कामी करून देण्याचे सांगितले. अध्यक्षांनी ते मान्य केले.

आपले कुलबांधव पोहणारे वीर श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे, मुलुंड यांनी त्यांचे वडील कै. आत्माराम विनायक मराठे व आई कै. इंदिरा महादेव मराठे ह्यांच्या स्मरणार्थ ५००रु.ची देणगी दिली. तसेच श्री. चिंतामण महादेव मराठे, लालबाग यांनीही पितरांचे स्मरणार्थ दोन वर्षाचे एकदम रु.१०००/- देणगी म्हणून प्रतिष्ठानला दिले. कार्यवाहांनी दोघांचे आभार मानले. आणखीही कुलबांधव हितगुजचे वर्गणीदार झाले. त्यांचेही आभार मानले.

सुप्रसिद्ध निवेदक श्री. भाऊ मराठे यांनी थोड्यावेळातही मनोरंजक किस्से सांगून उपस्थितांना हसविले. चविष्ट भोजनाने सभेची सांगता झाली.

## सहवेदना

साप्ताहिक किरात (वेंगुर्ले)चे संस्थापक-संपादक श्री. श्रीधर केशव मराठे (पृ.३९६) यांच्या सुविद्य पत्नी सौ. शुभदा यांचे श्रावण वद्य द्वादशी, शुक्रवार दिनांक २६-८-२०११ला प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती श्रीधर, दीर सुनील, मुलगा शशांक, सून सौ. सीमा, नातू चिन्मय इ. मराठे परिवार आहे.

सौ. शुभदा या माहेरच्या गणपतीपुळ्याच्या मीना केळकर. एक करारी, धाडसी व्यक्तिमत्व, अफाट वाचन, चिंतन, लेखन, वक्त्या, सार्वजनिक कार्यात व्यस्त, हसतमुख, उत्साही, पत्रकार घराण्यातील पती श्रीधर मराठे यांच्या खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी. उणापुऱ्या तीस वर्षांचे शुभदा व श्रीधर यांचे सहजीवन, त्यांच्या जाण्याने समाज एका चांगल्या कार्यकर्त्याला मुकला आहे. त्यांच्या निधनाने शशांकवरील मातृछत्र हरपले आहे. श्रीधरराव एकाकी झाले. त्यातल्या त्याच भाग्याची गोष्ट म्हणजे त्या सवाष्णपणे अहेवमरण त्यांनी मिळविले. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात मराठे प्रतिष्ठान सहभागी आहे. कै. सौ. शुभदा श्रीधर मराठे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## साहित्यासाठी आव्हान

अपत्यप्राप्ती, जन्म-मृत्यू, परीक्षेतील यश, कला-क्रीडा, सामाजिक सेवा, समाजकार्यातील प्रगती, पदोन्नती, विवाह, परदेशगमन इ. आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या घटनांची माहिती 'हितगुज'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवावी. तसेच कथा, कविता, निबंध, ललित, वैचारिक साहित्य, विनोद, पाककृती, सुविचार इ. साहित्य पाठवावे ही विनंती.

# आठवणीतल्या गुजगोष्टी

सौ. विद्या दळवी (मराठ्यांची माहेरवाशीण)

*सौ. विद्या दळवी यांच्या मातोश्री कै. सौ. प्रमिला लक्ष्मण मराठे यांना जाऊन २४ सप्टेंबर २०११ ला एक वर्ष पूर्ण होत आहे त्यामुळे प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कन्येने वाहिलेली सुमनांजली*

लग्न झाल्यामुळे पुण्यातून उठून सोलापूर जिल्ह्यातल्या एका छोट्या गावात राहायला जाणं - तोही पन्नास-साठ वर्षांपूर्वी - म्हणजे एक दिव्यच असणार. पुढे त्या गावात नवीनच निघालेल्या शाळेमध्ये नोकरीची सुरुवात हे एक विशेष, तेही आपली मुलं लहान असताना हे दुसरे विशेष! पण माझ्या आईने त्या काळात अगदी आनंदाने हे दिव्य पार पाडले. नोकरीची गरज तिला फारशी नव्हती; पण ती शाळेची गरज होती. लहान गावात ट्रेंड (प्रशिक्षित) शिक्षक मिळणे कठीण; मात्र आईचे ट्रेनिंगचे शिक्षण आणि थोडी नोकरीही पुण्यामध्ये झालेली होती. त्यामुळे तिला मुद्दाम बोलवले गेले. वडिलांनीही परवानगी दिल्याने ती शाळेत रुजू झाली. मी पहिलीत होते. भाऊ मात्र लहान असल्याने जवळच्या ओळखीच्या कुटुंबात दिवसभर त्याला सांभाळायला ठेवून शाळा सुरू झाली.

मी सातवीत होते, तेव्हा तिने मॅट्रिक म्हणजे अकरावीच्या परीक्षेला बसायचे ठरवले. नोकरी, घर, मुले सर्व सांभाळून चांगले यश मिळवले. शाळेतल्या सर्व उपक्रमात तिचा सहभाग असेच. परंतु स्कॉलरशिपचे वर्ग ही तिची खासियत झाली. दरवर्षी काही मुले या परीक्षेत चमकू लागली. एक-दोन वेळा तर जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळाला. तिची चित्रकला चांगली होती. तसेच हिंदीची 'कोविद' परीक्षाही झाली होती. त्यामुळे हे विषयही तिला शिकवावे लागत. लांबच्या सहलींचे कामही तिने पाहिले आणि आयत्यावेळी आलेल्या अवघड अडचणींवर प्रसंगावधान राखून मार्ग काढला.

१९८०-८१साली तिला त्याचाच संस्थेच्या पुण्यातल्या शाळेत मुख्याध्यापिका म्हणून बदली मिळाली. ती शाळाही नवीनच होती. अध्यापना-बरोबर व्यवस्थापनाची खूप महत्त्वाची जबाबदारी होती. सर्वांना बरोबर घेऊन काम करणे, नियमांचे पालन करतानाच सहकाऱ्यांच्या वैयक्तिक अडचणीत सहृदयतेने आधार देणे हे तिने कौशल्याने केले. १९८७ साली ती मानाने आणि समाधानाने निवृत्त झाली. मात्र निवृत्तीनंतरही स्वस्थ न बसता तिने घरीच शिकवणीचे वर्ग घेतले.

एक माणूस म्हणूनही ती खूप मोठी होती. होतकरू मुलामुलींना मदत आणि प्रोत्साहन हे तर नेहमीचेच होते. तिच्या एका विद्यार्थिनीला तर पुण्याला पाठवून स्वत:च्या पायावर उभे केले - तेही तिच्या आईवडिलांचा विरोध असताना. परधर्मातील 'ती' मग आईची दुसरी मुलगीच झाली. गुणी, कष्टाळू मुलांच्या आर्थिक अडचणीतही तिने शक्य तेवढी मदत केली, घासातला घास काढून दिला. त्या मुलांनाही त्याचे चीज केले.

आई म्हणून तिने मला लहानपणापासून खूप उत्तेजन दिले. ''छोट्या गावात स्पर्धा कमी असते. त्यामुळे 'वासरात लंगडी गाय शहाणी' या न्यायाने तुझा पहिला नंबर येतो. त्यावर समाधान न मानता अधिक प्रयत्न करा.'' असे तिचे नेहमी सांगणे असे. अभ्यासाबरोबर इतर गोष्टीही मी कराव्यात हा तिचा कटाक्ष होता. संस्कृत-मराठी स्तोत्रे, गीतेचे अध्याय, शाळेच्या हस्तलिखितासाठी लेखन, सभेत भाषण, चित्रकला-रांगोळी यात भाग घेणे, मैदानी खेळात, स्पर्धेत भाग (मी खोखो खेळत असे) टी.म.वीच्या हिंदी, इंग्रजी, संस्कृत भाषेच्या परीक्षा देणे. असे मी सर्व तिच्यामुळे करू शकले. मी कंटाळा केला तर ती स्वत: मला समजावून चिकाटीने भाग पाडत असे. याहून सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दहावी-अकरावीसाठी तिने मला पुण्याला होस्टेलमध्ये शिकायला पाठवले. त्या काळामध्ये हा विचार करणे, तो अमलात आणणे, त्यासाठीची आर्थिक तरतूद, मानसिक दडपण या सर्वांसाठी माझ्या आईला आणि वडिलांनाही खूप काही सोसावे लागले असे हे मला आता कळते.

आईचा चित्रकलेचा वारसा माझ्याकडे थोडाफार आला. पण तिचे पाककौशल्य मात्र मी घेतले नाही. रोजच्या मऊसूत पोळ्या, सणासाठीच्या पातळ पुरणपोळ्या तिच्या हातच्याच खाव्यात. नारळाच्या, श्रीखंडाच्या, आंब्याच्या वड्या करण्यात तिचा हातखंडा होता. पाकातल्या पुऱ्या, खुसखुशीत चकल्या अजून दोन खास पदार्थ! आमच्या घरची चैत्रगौरीच्या हळीद-कुंकवासाठीची आरास खास असे. अत्यंत विचारपूर्वक ठरवलेली उपयुक्त अशी वस्तू आणि घरचा काटेदार हलवा ही संक्रांतीच्या हळदी-कुंकवाची उत्सुकता असणारी गोष्ट होती. आईला झाडे, पाने, फुले, पक्षी यांचीही आवड होती, आमच्या घराभोवती छानशी बाग आणि शेणसडा घातलेले अन् रांगोळीने सजलेले अंगण होते.

माणूस म्हटला की काही गुण आणि काही दोष असणारच. आईच्या स्वभावातल्या किंवा वागण्यामधल्या टोचणाऱ्या गोष्टींची बोच मला फारशी जाणवली नाही. कदाचित कारण असे आहे की, १५-१६व्या वर्षांपासून मी शिक्षणासाठी घरापासून दूर राहिले. त्यामुळे चांगली समज आल्यावर सलग दीर्घकाळ सहवास घडला नाही. ज्या व्यक्ती तिच्याशी समजून-उमजून वाईट वागल्या, त्या व्यक्तींबाबत तिच्या मनात कायमच अढी राहिली. घडलेल्या अप्रिय गोष्टी अन् व्यक्तींचे वागणे ती कधीच विसरू शकली नाही. दुसरे म्हणजे असत्य तर नाहीत, पण ती अर्धसत्यही बोलू शकली नाही. त्यामुळे ती कधी कधी काही व्यक्ती किंवा प्रसंग टाळू शकली असती, असं मला वाटतं. कोण जाणे, तिच्या दृष्टीकोनानुसार

ती बरोबरच वागली असेल.

मला सर्वांत पुन्हा पुन्हा आठवतो तो तिचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि समाधानी वृत्ती! तिच्याही आयुष्यात अडचणी, कसोटीचे प्रसंग आले. खरंतर काही थोड्या प्रसंगी माझे आणि कधी भावाचे वागणे त्याला कारणीभूत होते. पण ती नेहमी 'पुढे' पाहायची. 'झालं ते झालं. गंगेला मिळालं. पाठीवर टाकून पुढे जायचं. देवाने तेवढ्यासाठीच मोठी पाठ दिलीय' असं ती म्हणे. तशी तिची तब्येत ठणठणीत होती. परंतु ज्या दुखण्यांच्या नावालाही लोक घाबरतात अशा दोन-दोन दुखण्यांचा हृदयविकार आणि कॅन्सरचा तिने धीरोदत्तपणे आणि सोशिकतेने सामना केला तोही उतारवयात. कितीतरी वेळा हॉस्पिटलची वारी घडली. पण अगदी शेवटपर्यंत तिने डॉक्टरांना आणि त्यांच्या वेगवेगळ्या तपासण्यांना तोंड दिले आणि प्रतिसादही दिला. ज्यांनी स्वत: हे अनुभवलेय त्यांनाच कळेल की यासाठी केवढे मानसिक बळ, सहनशीलता व इच्छाशक्ती तिच्यापाशी असेल.

या सगळ्या प्रवासात अर्थातच माझ्या वडिलांची साथ, सहकार्य नक्कीच होते. खरं तर अगदी आईला नोकरी करण्याची परवानगी दिली तेव्हाही जुन्या पिढीला ते रुचले नव्हतेच. परंतु दोघेही आपल्या निर्णयावर ठाम राहिले. नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या प्रत्येक गोष्टीकडे - घर, मुले सण-समारंभ, आजरपणं - अगदी बारकाईने लक्ष असण्याचा आणि काही चूक सापडली की, नोकरीवर खापर फोडण्याचा तो काळ होता; तशी सामाजिक परिस्थिती होती.

सर्वसाधारण समाजमन तसा विचार करत असावे. त्यामुळे आईला व तिच्या जोडीने वडिलांनासुद्धा थोडेफार सोसावे लागले असणार. अर्थात जसा काळ बदलला तसे सर्व बदलत गेले. आईच्या प्रकृतीची तक्रार सुरू झाल्यावर वडील आणि त्यांच्या जोडीने माझ्या भावानेही खूप कष्ट, अडचणी सोसल्या. बऱ्याचा गोष्टींमध्ये तडजोड केली. सगळ्यांनाच काही सवयी बदलाव्या लागल्या. घरकामासाठी माणसे ठेवली तरी तिचे खाणे-पिणे, औषधपाणी, घरातला वावर आणि नियमित डॉक्टरी चेकअप या गोष्टी काही वर्षे दोघांनी मिळून निभावल्या. कुठे काही कमतरता राहू दिली नाही, तेही बाबांचे वय ८५च्या पुढे असताना!

आता तिला जाऊन वर्ष झाले आहे. जीवनाचा ओघ पुढे चालला आहे, थांबून चालणारही नाही. रोजचे व्यवहार चालू असताना मनाच्या खोल कप्प्यात तिच्या आठवणीची मंद धून सततच सुरू असते, आणि ती तशीच गुंजत राहील हे नक्की!

**- सौ. विद्या दळवी**

ए १/४ प्रियदर्शनी सोसायटी, पंचवटी,

पाषण रोड, पुणे ४११ ००८ फोन : ९६०४८४९४१९

## प्रचिती

आम्ही विमानाने अहमदाबाद-दिल्ली व दिल्ली-श्रीनगर गेलो. रात्री सोनमर्गला मुक्काम करून सकाळी सहा वाजता बालताल येथे हेलीपॅडवर आलो. हवामानामुळे ७.५५ चे हेलिकॉप्टर १०.१५ला मिळाले व ११.०० वाजेपर्यंत पंचतरणी हेलिपॅडवर उतरलो. अकरा-सव्वा अकराला घोड्यावरून अमरनाथचे दर्शन घ्यायला निघालो. अमुक एका अंतरापर्यंत घोड्यावरून व मग डोली करावी लागली. गर्दी फार होती. माझ्या सौ.सुषमाची व मित्राची स्वतंत्र डोली गुंफेकडे निघून गेली. माझी डोली मागे राहिली. ठिकठिकाणी मिलिटरी असते. त्यांची ऑर्डर झाली की आता डोली थांबवा व डोलीतल्या लोकांना दर्शनाला चालत पाठवा. माझा डोलीवाला म्हणाला, ''साहेब मी तुमच्याबरोबर चालतो व तुम्हास आधारही देतो.'' परंतु अमरनाथाच्या गुंफेकडे पाहून व चढणीचा वेडावाकडा रस्ता पाहून मला बऱ्याच वेळ घोड्यावर बसल्यामुळे काय किंवा ऑक्सिजन कमी पडत होता म्हणून काय समोर गुंफा दिसत असूनही चालण्याची हिंमत होत नव्हती. मी माझ्या पालखीवाल्याला म्हणजे डोलीवाल्याला सांगितले मी तुला पैसे डोलीचे देतो पण इथूनच मनोमन नमस्कार करतो व अमरनाथ गुंफेकडे पाहून नमस्कार केलाही व माझे डोलीवाल्याशी चाललेले. बोलणे माझ्या शेजारी उभे असलेल्या मिलटिरीवाल्यांनी ऐकले व त्यांनी मला विचारले, ''साहेब क्या प्रॉब्लेम है?'' मी म्हटले तुमचा ऑर्डर आहे डोली थांबवा व मला वर चढवत नाही, तेव्हा मी येथूनच नमस्कार करतो. त्यांनी ताबडतोब ऑर्डर केली व डोलीवाल्याला डोली घेऊन जायला सांगितले व साहबको उपर ले जावो म्हणाला. व मला अमरनाथाचे लिंग बर्फाचे असते तिथपर्यंत डोलीवाला घेऊन गेला. मला उत्तम दर्शन झाले तिथे दोन कबुतर असतात ती पाहायला मिळाली की तुमची यात्रा झाली असं म्हणतात मला ती पण डोलीवाल्यांमुळे पाहावयास मिळाली. व माझ्या डोळ्यात पाणी आले. व अमरनाथला नमस्कार करून प्रार्थना केली की तू दर्शन घडविलेस तेव्हा ज्यांच्यामुळे दर्शन घडले. त्यांना सुखी ठेव व माझेकडून उत्तम कार्य ऊर्वरित आयुष्यात होऊन दे असा आशीर्वाद मागून परतीच्या प्रवासाला लागलो. ह्या यात्रेचे वर्णन आणखी कोणत्या शब्दात करायचे हे मला सुचत नाही.

**- श्री. मोहन मराठे,** विक्रम एजन्सी, समर्थ, शिलापुरा, रावपुरा, वडोदरा ३९० ००१, फोन : ०२६५-२४१३०३०

## नांदा सौख्यभरे

सौ. ज्योती व श्री. प्रमोद कुलकर्णी यांची सुकन्या चि. सौ. कां. नेहा हिचा शुभविवाह चि. सिद्धार्थ गिरीश वर्मा याजबरोबर सोमवार दिनांक २० जून २०११ ला 'इंद्रप्रस्थ हॉल' पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला. मराठे प्रतिष्ठानद्वारा वधूवरांना अनेकोत्तम शुभाशीर्वाद व शुभेच्छा.

(सौ. ज्योती या बेळगावच्या मराठ्यांच्या माहेरवाशीण आणि 'हितगुज'चे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मण शंकर यांची पुतणी आहे.)

# संत एकनाथांची उत्कट दत्तभक्ती : एकनाथ महाराजांची श्रीदत्तात्रेयाची ध्यानमूर्ती

डॉ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०)

**एकनाथांच्या काळातील दत्तोपासनेचे प्रा. न. र. फाटककृत समालोचन**

दत्त या देवताने आपला प्रभाव विजापूरच्या आदिलशाहीत निर्माण केल्याची साक्ष गुरुचरित्र या ग्रंथात ठळकपणे आलेली आहे. दत्तामुळे शुक्रवार ऐवजी 'गुरुवार' हा सदर मुसलमानी अमदानीत सुट्टीचा दिवस मुक्रर करण्यात आला, अशी कथा उपलब्ध आहे. दौलताबादसारख्या महत्त्वाच्या किल्ल्यावर मुसलमानांऐवजी एक हिंदू व तोही पुन: परमार्थमार्गातला नेमला जाऊ शकतो ही बदलत्या परिस्थितीची एक खूण आहे. आदिलशाहीतच बादशाहच्या गायनाच्या व कवित्वाच्या गोडीमुळे सरस्वतीदेवीचा महिमा वाढला होता.

याप्रमाणे ही राज्ये जरी आपल्या हद्दीत हिंदू प्रजेचा, उघड उघड राज्य कारभाराचे अवश्य धोरण म्हणून छळ करीत नसली तरी या राज्यांचे आपापसांतील झगडे हिंदू प्रजेला सतावून सोडीत असत. सोळाव्या शतकाच्या प्रारंभी गोव्याकडे पोर्तुगीजांची धाड येऊन प्रजेच्या छळाच्या 'फिरंगाण' हा नवा प्रदेश निर्माण झाला. समुद्र किनाऱ्यावर 'फिरंगाणा'च्या आधी जंजिरेकरांचे 'हबसाण' सिद्ध होतेच. यापैकी एका राज्याचे सैन्य दुसऱ्या राज्याच्या हद्दीत शिरले म्हणजे पहिला धडाका हद्दीवरल्या लोकांना बसत असे व प्रत्यक्ष लढाईच्या धामधुमीत हिंदुनाच लुटालुटीला, जाळपोळीला, बाटवा-बाटवीला, कत्तलीला किंवा बायकांच्या पळवा-पळवीला मोठ्या प्रमाणात बळी पडावे लागत होते. दोन्हीकडच्या सैन्यात हिंदूंचा भरणा मोठा असे पण अंतिम अधिकार मुसलमानांच्या हातात असल्यामुळे लढाईत घडलेल्या प्रतिकाराचा सूड ते शत्रू राज्यातील हिंदूंवर घेत व त्याची हिंदू अंमलदारांना खंत वाटत नसे. निरनिराळ्या महत्त्वाकांक्षी सरदारांची भांडणे वारंवार पेट घेऊन प्रजेला छळत असत.

मुसलमानी धर्मातील समजुतीप्रमाणे मुस्लिम राज्यात बिगर मुसलमानी प्रजेला आपल्या देवा-धर्माची सेवा करण्याची निर्विघ्न संधी मिळणे शक्य नाही. परंतु त्यांच्या देवळांची मोडतोड, तीर्थस्थानांचा विध्वंस, सणावारांच्या यात्रा उत्सवांना प्रतिबंध वगैरे प्रकार चालू होते. त्याचप्रमाणे परदेशातून नावाजलेल्या मुसलमान साधूंना इकडे बोलावून आणण्याचा तेथील सुलतानांना नाद होत. येथील मुस्लिम साधूंनाही थोरवीस चढविण्याची प्रथा होती. मुसलमान साधू मेला की त्याच्या थडग्याचा पीर बनत असे. पीरांच्या इमारतीला दर्गा म्हणतात. अशा मुसलमान साधूंचे जिकडेतिकडे उभे राहणारे दर्गे म्हणजे मोठे संकटच होते. एखाद्या फकीर अवलियाची महती राज्यकर्त्यांमध्ये वाढली की त्यांचे शिष्यत्व स्वीकारून राज्यकर्त्यांची कृपा आपल्यावर व्हावी, मेहेरनजर असावी म्हणून दरबारात हिंदू टपलेले असत. मुसलमान साधू हिंदू शिष्यांच्या मुर्वतीखातर मांसाहार करीत नसत. हिंदूंकरिता मिठाईचा प्रसाद वाटण्याचा त्यांचा प्रघात होता. उघड उघड देवळे पाडण्यापेक्षा हा प्रकार जास्त घातक होता. मुस्लिम गुरुचे हिंदू शिष्य नेहमीच व्यवहारात ह्या गुरुमंत्रानुसार वागत असत. ज्याचा गुरु मुसलमान त्याच्या ठिकाणी हिंदुत्वाचा अभिमान कितीसा जागृत असणार? हिंदूतील थोरामोठ्यांच्या बुद्धिची अशी भ्रष्टता पीरांच्या भक्तीने सर्वत्र प्रकट होऊ लागली. साधारणपणे सख्या भावाचे उष्टे खायला कचरणाऱ्याने दर्ग्यात प्रसाद म्हणून उच्छिष्टाच्या मिटक्या माराव्यात, पीराची पूजा करून, पीराला नवस करावे, त्याच्या उरसात मोठ्या श्रद्धेने सामील व्हावे, दर्ग्यातील वस्तू पवित्र समजून निरंतर वंदाव्या, अशासारखे प्रकार रिवाज हिंदूत बोकाळले आणि देवळांच्या मशिदी झाल्या, देव मूर्तींच्या दगडांना पालथे करून त्यांच्या पायऱ्या बसविण्यात आल्या, तीर्थस्थाने उजाड बनली.

अवलिया - पीरांच्या भक्तीने प्रत्यक्ष धर्मांतर न करता धर्मांतराचे परिणाम हिंदूंच्या स्वभावात कसे शिरत होते त्याचे उत्तम उदाहरण दत्ताच्या साक्षात्कारात आढळते. दत्त ही देवता मुसलमान फकीराच्या रूपाने आपल्या भक्तांना दर्शन देत असल्याच्या कथा भक्तीमार्गाच्या मराठी वाङ्मयात पुष्कळ असून एकनाथांनासुद्धा त्याच स्वरूपात दत्तांचे दर्शन घडले ही तशा साक्षात्काराची एक खूण ठरते. कामधेनू, कुत्रीच्या देहाने दत्ताबरोबर त्यावेळी होती. तिचे दूध जनार्दन स्वामींनी प्राशन केले. वस्तुत: कुत्रीचे दूध हे हिंदूला - त्यांच्यातल्या त्यात उच्च वर्णिय हिंदूला अमंगळच वाटावे. पण मुसलमानी अमदानीत त्याचा निषेध राहिला नव्हता.

पूर्वी ब्राह्मणाच्या रूपाने भूलोकीचा व्यवहार देव करीत असत. आता त्यांनादेखील मुसलमानांच्या राजवटीने मुस्लिम फकिराचे रूप धारण केल्या-खेरीज इहलोकी वावरण्याची चोरी झाली होती, व त्या रूपाचा आदर करण्याइतकी हिंदूंची धर्मनिष्ठा, उदारता किंवा शिथिलता पावली होती.

**पावलांसे ठसे**

दत्ताच्या जुन्या पूजास्थानातूंन या देवतेच्या केवळ पावलाचे ठसे अथवा आकार असलेले दगड ठेवले आढळतात, मूर्ती नसते हेदेखील मुसलमानांच्या राज्य कर्तृत्वाने निर्माण केलेल्या स्थित्यंतराचे गमक संभवते. प्राचीन काळात सत्पुरुष मानला गेलेला दत्त पुढे उपास्यदैवताच्या योग्यतेस चढला. त्याची उपासना मुसलमानांच्या राजकीय प्राबल्याच्या दिवसात उत्कर्षात आली. मुसलमानांचे प्राबल्य देवळे व देव यांचा धुव्वा उडविणारे असल्याने, मूर्ती नसलेल्या देवस्थानांना धोका कमी हा अनुभव पावलांच्या पूजास्थानास प्रेरक झाला असल्यास नवल नाही.

प्रा. न. र. फाटक म्हणतात तशी सामाजिक आणि राजकीय परिस्थिती बहामनीकालापूर्वीपासूनच महाराष्ट्रात नांदत होती. जैन धर्माला उत्तेजन देणारा ईल राजा एलिचपूर येथे राज्य करत होता (इ.स.-१०५८च्या सुमारास) त्याच्या दरबारी गझनीच्या एका फकिराचा अपमान झाल्यामुळे, महमूद गझनीचा भाचा रहिमशहा त्याच्यावर चालून आला; त्यामुळे महाराष्ट्रात हिंदुमुसलमानांच्या दंग्यास प्रारंभ झाला. या युद्धात दोघेही मेले. सुफी धर्मप्रचारकांबरोबर इ.स.१३००च्या सुमारास आलेल्या मोझजुद्दिन

याने दक्षिणेत पैठण येथे तळ ठोकून अवघ्या तीनवर्षात प्रथम महालक्ष्मीच्या देवळाचा ताबा घेऊन नंतर जवळच असलेल्या एकविरा आणि विनायकाची मंदिरे उद्ध्वस्त करून मशीद बांधविली. अशा रीतीने, मुसलमान सुफी धर्मोपदेशकांनी आणि हिंदूवर राज्य करणाऱ्या इस्लामीयांनी हिंदूचा विश्वास बहाबनीकालापर्यंत पूर्णपणे गमविला होता.

याला पुरावा शेख महंमदबाबा श्रीगोंदेकर यांनी लिहिलेल्या योगसंग्राम या ग्रंथात मिळतो. हा ग्रंथ शके १५६७, श्रावणशुद्ध १५ सह प्रतिपदा, सोमवारी म्हणजे २८ जुलै १६४५ मध्ये लिहिला गेला आहे. आपल्या योगसंग्राम ग्रंथात शेख महंमदबाबा म्हणतात :

*एक म्हणती हा यातीचा मालवंश।*
*म्हणोनि निखंदितो आमुच्या देवतांस*
*यावा मानूं ना आम्ही विश्वास*
*प्रतिमा निखंदिल्या ॥६२॥*
*देखत अविंध देवळें मोडिती।*
*हा तो त्यांच्याच स्वयाति।*
*येणें प्रतिमेची केली माती।*
*आतां काय पुजावे।६३॥*
*यवन देवतांस करिती मार।*
*हे तंव चालिले असे अपरंपार।*
*आम्ही वंदू ना यांचे उत्तर।*
*हा त्याचाच गोत्या॥६४॥*

- प्रसंग १६वा.

तेव्हा महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय परिस्थिती प्रा. न. र. फाटक म्हणतात तशी असली तरी धार्मिक क्षेत्रात मुसलमानांना चोख प्रत्युत्तर मिळत होते, हे एकनाथांच्याच अनेक अभंगांतून सिद्ध होते. उलट असे म्हणता येईल की हिंदूंच्या तत्त्वज्ञानाचाच प्रभाव या सुफी धर्म प्रचारकांवर पडू लागला होता. शेख महंमदाचा योगसंग्राम, अंबर-खानाची हुसेनांबरी इत्यादी ग्रंथ याची साक्ष देतील.

परंतु प्रा. फाटकांनी आपल्या विवेचनात दत्तपादुकांबद्दल जे विचार प्रकट केले आहेत ते स्वीकारणे मात्र कठीण दिसते. प्रा. न. र. फाटक म्हणतात. त्याप्रमाणे दत्ताच्या जुन्या पूजास्थानातून दत्तदेवतेच्या केवळ पावलांचे ठसे अथवा आकार असलेले दगड ठेवलेले आढळतात ही गोष्ट खरीच आहे. गिरनार येथील दत्तशिखर अथवा महाराष्ट्रातील ''औदुंबर'' या दत्तक्षेत्री किंवा नरसोबाच्या वाडीस दगडावर ही पदचिन्हे कोरलेली आढळतात. परंतु या पावलांची योग्य ती संभावना न ठेवता, मान न देता, त्यांचा अवमान करून या पादुकांना केवळ, ''पावलांचा आकार'' असलेले दगड असे हिणविण्यात प्रा. न. र. फाटकसुद्धा परधर्मीयांच्या हिंदुत्वविरोधी भावनेस हातभारच लावताना आढळत नाहीत काय?

या पावलांच्या आकारांना पादुका म्हणतात, तेव्हा त्यांचे दगडत्व जाते. तिथे पावित्र्य नांदते. हिंदुधर्मात पादुकांच्या पूजास्थानाला फार मोठे महत्त्व अतिप्राचीन काळापासून प्राप्त झाले आहे. हे प्रा. न. र. फाटकांना माहीत नाही असे नाही. प्रा. फाटक म्हणतात तसे मुसलमानांच्या राज्य कर्तृत्वाने निर्माण केलेल्या स्थित्यंतराचे हे गमक निश्चितपणे संभवत नाही.

भारतीयांच्या धर्मशास्त्रात, धर्माचरणात संत सज्जन, साधुसंत आणि सद्गुरू यांच्या चरणांच्या सेवेत अत्यंत महत्त्व सनातन कालापासून प्राप्त झाले आहे; त्यामुळे त्यांच्या पादुकांनाही अनन्य-साधारण महत्त्व लाभले आहे. पुण्यवंतांच्या पादुकांचे घरातील अस्तित्व म्हणजे त्या महात्म्यांची आपल्या घरात प्रत्यक्ष उपस्थितीच मानली जाते. इतकेच नव्हे तर त्यांच्या पादुकांशी तद्रुपता म्हणजेच परिपूर्ण ध्यान मानले जाते. भावनोपनिषदामध्ये म्हटले आहे.

*''सत्वमस्ति कर्तव्यम-*
*कर्तव्यमोदासीन्य नित्यात्मविलापनं होमः।*
*स्वयं तत्पादुका निमजन परिपूर्णध्यानम्''॥३॥*

''(आपला आत्मा) सत्यस्वरूप आहे असा दृढ निश्चय करून, कर्तव्य, अकर्तव्य, औदासिन्य, नित्य आत्मचिंतनासक्ति हाच यज्ञ आहे. तसेच स्वतः त्या परब्रह्माच्या पादुकांशी एकरूप होण्यातच परिपूर्ण ध्यान होते.''

''एवं मुहूर्तत्रयं भावनापरो जीवन्मुक्तो भवति। तस्य देवता ऽऽ त्मैक्यसिद्धिः''। अशा रितीने जो तीन मुहूर्त भावनापर होतो तो जीवनमुक्त होतो, तो ब्रह्मेक स्वरूप होऊन जातो.''

## पादुकांचे महत्त्व

या उल्लेखांवरून पादुकांचे अनन्यसाधारण महत्त्व ध्यानात यावे.

भारताच्या आर्ष काव्यात, रामायणामध्ये पादुकांच्या पूजेचा उल्लेख आढळून येतो. कैकेयीला दिलेल्या वरांची पूर्ती करण्यासाठी प्रभू रामचंद्र राज्यत्याग करून वनवासात जातात. ठरल्याप्रमाणे भरत गादीवर बसावयाचा. परंतु त्यास हे मान्य नसते. म्हणून रानावनात जाऊन भरत प्रभू रामचंद्राचा शोध घेऊन, त्यांच्या पादुका आणून राज्यकारभार पाहू लागतो. या विषयी वाल्मिकी म्हणतात :

*भ्रातुर्वचनकारी च प्रतिज्ञापारगस्तदा।*
*पादुके त्वभिषिच्याय*
*नन्दिग्रामेऽवसत् तदा॥२४॥*
*सव्यालव्यजनं छत्रं धारयामास स स्वयम्।*
*भरतः शासनं सर्वं पादुकाभ्यां निवेदम॥२५॥*
*ततस्तु भरतः श्रीमानभिषिच्यार्यपादुके।*
*तद्धीनस्तदा राज्यं कारयामास सर्वदा॥२६॥*
*तदा हि यत् कार्यमुपैति किंचि -*
*दृपायनं चोप हृतं महार्हम्।*
*स पादुकाभ्यां प्रथमं निवेद्य*
*चकार पश्चाद् भरतो यथावत॥२७॥*

*- वाल्मिकी रामायण:*
*अयोध्या काण्डः अध्याय ११५*

''आपल्या बंधूंच्या वचनाची पूर्ती करण्यासाठी, आणि आपली प्रतिज्ञा पार पाडण्यासाठी भरताने (प्रभू रामचंद्राच्या) पादुकांवर अभिषेक करून तो नंदिग्राम येथे राहू लागला. भरताने (त्या पादुकांवर) स्वतः छत्रचामरे धरली आणि शासनाचे सर्व कामकाज तो त्या पादुकांना निवेदन करू लागला. त्या पादुकांच्या आधीन होऊन तो राज्यकारभार पाहू लागला. काही राज्यविषयक कार्य उपस्थित झाले असता किंवा कोणी काही मोठा नजराणा आणून दिला असता, भरत प्रथम तो पादुकांना निवेदन करी, आणि नंतर त्या राज्यकार्याची यथायोग्य रीतीने व्यवस्था लावीत असे.'' (२४-२७)

वाल्मिकी रामायणाचा लेखनकाल सुमारे २३०० वर्षांपूर्वीचा म्हणजे इ.स.पूर्व तिसऱ्या शतकाचा असावा, असे श्री. ए. डी. पुसाळकर मानतात. रामायणातील घटना मात्र तत्पूर्वी घडून गेल्या असाव्यात असेही मत ते व्यक्त करतात. भरताला या पावलांच्या लाकडी ठशांची इतकी मातब्बरी का वाटावी? हा इस्लामचा प्रभाव म्हणता येईल काय? कारण सुफी पंथाचा उदय ख्रिश्चन प्रभावामुळेच इ.स.७व्या शतकात झाला असल्याचे मत संशोधकांनी व्यक्त केले आहे.

भारतात पदचिन्हांची पूजा बौद्धांनी सुरू केली. बुद्धाच्या मूर्ती निर्माण होण्याच्या पूर्वी बौद्ध लोक दगडावर बुद्धाचा पाय खोदून त्याची

पूजा करीत असत. बुद्धाच्या पादुकांचा उल्लेख हालाच्या सत्तसईमध्ये आढळतो.

कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात, दापोली तालुक्यातील पन्हाळकाजी येथे काही गुंफा आढळल्या असून त्यातील लेणी अजंठा-वेरूळची प्रतिकृती मानली जातात. प्रथमत: ही लेणी खोदली गेली आणि तदनुसार अजिंठा, वेरूळची लेणी निर्माण झाली असे संशोधन पुढे आले आहे. ह्या पन्हाळकाजीच्या लेण्यामध्ये एका मोठ्या स्तंभावर, मंडळामध्ये पादुका खोदलेल्या आहेत. ह्या देवीच्या पादुका समजल्या जातात. समोरच सरस्वतीची मूर्तीही खोदलेली आढळते. ध्यान धारणेच्या किती तरी खोल्या इथे आढळतात. इ.स.च्या सातव्या शतकात ह्यूएनत्संग महाराष्ट्रात आला होता. त्याला कोकणात बौद्धांचे शंकर विहार असल्याचे दिसले. तेच ते पन्हाळकाजी असावे काय?

गयेतील पदचिन्ह विष्णूपद म्हणून ओळखले जाते आणि यात्रेकरू या विष्णुपदावरच पिंडप्रदान करीत असतात. ब्रह्मदेवाच्या पदांचीही पूजा होत असावी. कारण ब्रह्मदेवांच्या पादुकांचा पादमूळ उल्लेख राष्ट्रकूट दंतिदुर्गाच्या ५४९च्या ताम्रपटात आढळतो. दंतिदुर्गाने इ.स. ७१० ते ७५५पर्यंत राज्य केले हाते. वाकाटकांच्या राज्यात पादुकांची पूजा होत होती असा उल्लेख प्रा. र. म. भुसारी यांनी केला आहे.

गिरनार येथील दत्तटोकावर श्री दत्तात्रेयांच्या पादुका दगडावर कोरलेल्या आढळतात. हा गिरनार पर्वत फार प्राचीन कालापासून प्रसिद्ध आहे. प्राचीन काली या पर्वतास ऊर्ज्जयंत, अथवा रेवतकपर्वत,प्रभासपर्वत किंवा वस्त्रापथक्षेत्र या नावाने संबोधिले जाई. स्कंदपुराणातील प्रभास-खंडात या पर्वताचे महात्म्य सांगितले जाते. याच पर्वतावर सुभद्रहरणाची घटना घडली. सम्राट अशोकाच्या शिलालेखातूनही गिरनारचा उल्लेख होतो. या गिरनारपर्वतावरील पाच शिखरे अत्यंत प्रसिद्ध असून त्यातील एक अंबाटोक आहे. केलासा सारखे शिखर सोडून पार्वती येथे राहावयास आली म्हणून या टोकास शक्ती-पीठांमध्ये गणले जाते. गोरक्षनाथ टोकावर गोरक्ष-नाथांची तपोभूमी असून, दत्त टोकावर दत्तात्रेयांची तपोभूमी होती. येथील काली टोकही शाक्तपंथीयांमुळे एकेकाळी अतिशय गाजले होते. दत्तटोकावर दत्तात्रेयांच्या निर्गुण पादुका आहेत.

अतएव गिरनार येथील श्रीदत्तात्रेय यांची तपोभूमी लक्षात घेता, येथे श्रीदत्ताच्या निर्गुण पादुकांची स्थापना, श्रीदत्तात्रेयांच्या नित्याच्या वास्तव्यामुळे प्राचीन काळी झाली असून ती सुफींच्या भयामुळे झालेली नाही हे लक्षात यावे.

संतांच्या पादुकांचा विचार करता, मुकुंद-राजांच्या दोन समाध्या, आंबेजोगाई आणि बेतुल-जवळील खेडले या गावी आढळतात. दोन्ही ठिकाणी पादुका आहेत. स्वामी समर्थ रामदासांच्या पादुका, अक्कलकोटचे स्वामी समर्थ यांच्या पादुका, यांचेही पूजन नित्य होते. नुकतीच, श्री संतपाचलेगावकर महाराज यांच्या चिन्मय पादुकांची स्थापना झाली आहे. अतएव पादुकांची पूजा ही सुफींच्या वर्चस्वातून निर्माण झालेल्या भीतीपोटी निर्माण झाली असावी असे म्हणता येत नाही.

### मलंगवेष

श्री. दत्तात्रेयांनी नाथांना फकिराच्या वेषाने दर्शन दिले होते. फकिराचे रूप ही दत्तसाक्षात्काराची एक खूण ठरते असे प्रा. न. र. फाटकांनी म्हटले आहे. दत्ताचा मलंग वेष हा सुफींच्या प्रभावामुळे घेतला गेला असल्याची समजून विद्वानात प्रचलित आहे. कंगाल वेषात दत्तात्रेयांनी समर्थांना दर्शन दिल्याचे, श्री. आत्माराम स्वामी म्हणतात.

हा मलंग वेष अथवा कंगाल वेष सुफी पंथीय धर्मप्रचारकांचा होता असे निश्चित म्हणता येत नाही. संन्यास घेतल्यानंतर आपली चांगली वस्त्रे गेरुच्या रंगात बुडवून मलीन करण्याची प्रथा भारतात प्रचलित होती. मलिक मुहम्मद जायसीच्या पद्मावत काव्यामध्ये योग्यांच्या वेषाचे सुंदर वर्णन येते. योगवेष धारण करणाऱ्या रतनसेन राजाचे वर्णन करीत जायसी म्हणतो,

*चंदबदन ओ चंदन देहा ।*
*भसम चढाइ कीन्ह तन रवेहा ।*
*मुंद्रा स्त्रवन कंठ जपमाला ।*
*कर उदपान कौंध बघछाला ।*
*पाँवरि पाँव लीन्ह सिर छाता ।*
*खप्पर भेस के राता ।*

अवधूतवेष धारण करणाऱ्या राजा रतनसेनान, चंद्राप्रमाणे सुंदर असलेल्या आपल्याम मुखाला आणि देहाला भस्म फासले, मुद्रा, रुद्राक्षमाला, हातात कमण्डलू, खांद्यावर व्याघ्राम्बर, पायात पावरी, डोक्यावर छत्री, बगलेत खप्पर इत्यादी घेऊन आपला वेष गेरूमध्ये डुबवून लाल करून टाकला? थोडक्यात राजा रतनसेनाने राजवस्त्रे, राजचिन्हे टाकून देऊन मळकट वस्त्रे परिधान केली व तो नाथपंथीय अवधूत बनला. या मळकट अथवा 'मैला' वेषालाच मलंग अथवा आत्माराम म्हणतात त्याप्रमाणे कंगाल वेष असे म्हटले जाते होते, हे स्पष्ट दिसून येते. सूरदासाच्या भ्रमर गीतातील गोपींनी योग्याचे जे वर्णन केलेले आहे त्यातही असेच वर्णन येत असल्याचे श्री हजारीप्रसाद द्विवेदी म्हणतात. अशा रीतीने मैला ऊर्फ मलंग अथवा कंगाल वेष धारण करण्याची प्रथा भारतात फार पूर्वीपासून रूढ असून ती सुफी प्रभावामुळे प्रचारात आली असे म्हणता येत नाही. वस्तुत: सुफी धर्मप्रचारकांचा वेष 'मलंग' वेष होता, असेही निश्चितपणे सिद्ध करणारा पुरावा उपलब्ध झालेला नाही. भस्मोद्धलित सर्वांग आणि कोपीनधारी असे दत्तात्रेयांचे जे वर्णन भिक्षुकोपनिषदात येते, तोच वेष मलंग वेष म्हणून अहिंदूंनी संबोधिला असणे सहज शक्य आहे. दत्तात्रेयाच्या विकृताचरणामुळेही त्याच्या विकृत वेषास, मलंग अथवा कलंक म्हणजे कळकट असे म्हटले जाणेसुद्धा असंभवनीय वाटत नाही.

### भारतीय तत्त्वज्ञानाचा सूफी पंथावर पडलेला प्रभाव

मूलत: सूफी पंथाचा भारतीय धर्मावर अथा तत्त्वज्ञानावर प्रभाव पडला होता काय? अथवा सुफी पंथाची निर्मितीच भारतीय तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर झाली होती काय? या प्रश्नांचा शोध घेणे आवश्यक ठरते. या संदर्भात, एनसायक्लोपेडिया ऑफ रिलिजन ॲन्ड एथिक्स या कोषात म्हटले आहे, ''The influence of christianity, Neo-plationism and Buddism is an undersirable fact. It was in theair and inevitably made itself felt. Many former investigator held the view that this great movement which drew its left and strength from all classes and races in the Musilim's empire, could be adequately explained by pointing to one definite source (e.g. the Vedanta or New Platonism)''

भारतीय संस्कृतीचे एक ख्यातनाम गाढे व्यासंगी पंडीत श्री. गोपीनाथ कविराज सुफी पंथाबद्दल आपल्या, 'भारतीय संस्कृती और साधना' या ग्रंथात म्हणतात, ''हमारे विश्वास से सुफी मत के साथ भी त्रिपुरादि सिद्दांत का घनिष्ठ संबंध है। अबतक इस विषय की और किसी का ध्यान ही नही गया है।''

अतएव, सुफी मताचा भारतीय तत्त्वज्ञानावर पडलेल्या प्रभावापेक्षा, भारतीय तत्त्वज्ञानाचा सुफी मातवर पडलेला प्रभावाची पूर्ण चिकित्सा झाल्यानंतरच यासंबंधी निर्णायक मत देता येईल.

अशारितीने दत्तसंप्रदायावर सुफी पंथीय प्रचारकांचा प्रभाव पडला होता अथवा दत्तात्रेयांच्या पादुकांची (पावलाचा आकाराचे दगडी ठसे) उपासना त्यांच्या प्रभावामुळे सुरू झाली असे म्हणता येत नाही. तसेच मलंग वेष अथवा श्री दत्तात्रेयांचे फकिराच्या वेषातील दर्शन म्हणजे सुफी धर्म प्रचारकांच्या वेषाचे अनुकरण होय असेही म्हणता येत नाही. श्री दत्तात्रेयाचे फकिराच्या वेषातील दर्शन म्हणजे अवधूत योग्याच्या वेषाचे दर्शन होय, हेच पुराव्यांवरून सिद्ध होते.

सुफी पंथीय फकिराचा वेष कसा होता या संबंधी पुढील माहिती उद्‌बोधक ठरावी. इस्लामच्या पहिल्या दोन शतकांमध्ये जोडेभरडे लोकरी कपडे सामान्य लोकांमधील उपासना करणारे उपासक वापरीत असत. नंतरच्या काळात सुफी संप्रदायात गुढवाद शिरला आणि सुफी गूढवादी समजले जाऊ लागले. हे सुल्ली 'Pashmina-Push' म्हणजे लोकरी वस्त्रे वापरीत असत. इ.स. ७४८ मध्ये महम्मद बी. सलमा बसऱ्याला आला तेव्हा त्याला फरकत-अल-संजी हा सुफी लोकरी वस्त्रे परिधान करून सामोरा गेला. त्यावेळेस हम्मद त्याला म्हणाला, ख्रिस्ती धर्माची चिन्हे असलेली ही वस्त्रे उतरवून टाका. अशा तऱ्हेच्या सुफींच्या वेषाला, 'ख्रिश्चन उपासकांचा पोषाख' असे झिया अल रूहबान यानेही संबोधिले आहे. ख्रिश्चन धर्म प्रचारकांच्या या वेषाला मलंगवेष असे कोणीही संबोधिलेले दिसत नाही.

एकनाथ महाराजांना दत्तोपासनेचा मंत्र जनार्दनस्वामींकडून मिळाला, परंतु वंशपरंपरागत भागवतधर्माचा वारसा त्यांच्याकडे, त्यांचे पणजोबा भानुदास यांच्यापासून चालत आला. या भागवत धर्माच्या परंपरेवर संस्कारापुटे चढवली ती ज्ञानेश्वरीची. अशारीतीने एकनाथांचे कार्य म्हणजे प्रयाग क्षेत्री त्रिवेणी संगम झाल्याप्रमाणे बनले. एकनाथांच्या कार्याचे एकूण समालोचन करताना प्रा. ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, ''एकनाथांचा काल हा निजामशाहीचा काल होय. निजामशाहीच्या दरबारी नाथांच्या जन्माचे वेळी नरसोपंडित, कंवरसेन, संभाजी, चिटणवीस इ. हिंदू मुत्सद्दी महत्त्वाच्या हुद्यांवर नेमलेले होते. नाथांचे गुरू जर्नादन स्वामी दौलताबादच्या किल्ल्याचे प्रमुख अधिकारी होते. अशा प्रकारच्या राजकीय मानमरातबा बरोबर सरकारी तैनाती, जहागिरी, जमिनी वगैरेंच्या द्वारा ब्राह्मणमराठ्यांना आर्थिक सुस्थितीही प्राप्त होऊ लागली. भौतिक जीवनातील या प्रगतीचे पडसाद धर्म, भाषा, साहित्य इ. सांस्कृतिक क्षेत्रातही उमटू लागले. आणि महाराष्ट्राला लोकजागृतीची दुसरी प्रभावी लाट सोळाव्या शतकात उसळली.''

एकनाथांची समन्वयबुद्धी

एकनाथ हेच या सांस्कृतिक पुनरुत्थानाचे सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी होत. एकनाथांच्या व्यक्तिमत्त्वात दत्तसंप्रदाय, वारकरी पंथ व पैठणची परंपरा यांच्यातील वैशिष्ट्यांचा उत्कृष्ट मिलाप झाला आहे. त्यांचे गुरू जनार्दनस्वामी हे दत्तोपासक असल्याने गुरुपरंपरेने ते दत्तासंप्रदायी होत. परंतु जर्नादनस्वामींकडूनु त्यांना ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या ग्रंथांतील बोधाची दीक्षाही मिळाली होती. शिवाय वर्णाभिमान, विषमता व सकाम धर्माचरण या कट्टर दत्तसांप्रदायिकांुचया गोष्टी नाथांना रूचण्यासारख्या नव्हत्या. त्यामुळे त्यांनी आपले पणजोबा भानुदास यांच्यापासून चालत आलेल्या वंशपरंपरागत भागवत धर्माचा वारसा पुढे चालवला. वैदिक परंपरेच्या माहेरघरी, पैठणला एकनाथांचे वास्तव्य होते. त्यामुळे वैदिक परंपरेचा अभिमान, ब्राह्मणाचा कैवार, संस्कृत विद्येबद्दलचा असीम आदर, आणि लिहिण्याबोलण्यात पांडित्याचा डौल या गोष्टी पैठणच्या संस्कारांनी नाथांच्या ठिकाणी आल्या. ज्ञानेश्वरांचा वारकरी पंथ व पैठणची वैदिक परंपरा या दुहेरी संस्कारामुळेच अनेक गोष्टींचा मेळ घालणारी समन्वय बुद्धी त्यांच्या अंगी बाणलेली दिसते.

''सर्वांगीण आत्मविकासाच्याद्वारा लौकिक व आध्यात्मिक दोन्ही प्रकारची श्रेष्ठता कर्मठपणा. शब्दपांडित्य आणि आत्मनुभव, व्यक्तिविकास आणि समाजधारणा वगैरेंमधील द्वैतनष्ट करण्यात नाथांनी अभूतपूर्व यश संपादिले. वारकरी पंथाच्या तत्त्वज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहारातील आदर्श म्हणजेच नाथांचे चरित्र आणि चारित्र्य. प्रचंड ग्रंथलेखनाच्या व कीर्तनपुराणप्रवचनांच्या द्वारा सतत भागवत धर्माचा प्रचार करून वैदिक धर्म व लोकभाषा यावर ओढवलेल्या संकटाचे निवारण करण्याचा मार्ग त्यांनी दाखविला आणि आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धारही केला. त्यादृष्टीने आदर्श सुधारक व महाराष्ट्रातील उदार मतवादाचे जनक हीच नाथांची वैशिष्ट्यपूर्ण भूमिका होय.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
**(पृ.१२०)**
संपादिका
८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई

## मानसन्मान



कुमारी सोनल सुरेश मराठे ही मुंबई विद्यापीठातून बी.कॉम. पदवी परीक्षा प्रथमश्रेणीत ७४% गुण मिळवून उत्तीर्ण झाली. मराठे प्रतिष्ठानद्वारा कु. सोनलचे हार्दिक अभिनंदन.

पुढील शैक्षणिक यशासाठी शुभेच्छा.

(सोनलचे वडील श्री. सुरेश मराठे हे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीतील सदस्य असून ठाण्यातील 'हितगुज' अंकाचे वाटप स्वत: करतात.)

## 'माणूस' नावाची जनावरं

कावळे हल्ली मयताच्या श्राद्धाला
फारसे येत नाहीत.
विचारल्यावर एक वृद्ध कावळा म्हणाला,
''मयताच्या टाळूवरील लोणी खाणारे
खूप वाढलेत हल्ली, घाबरतो आम्ही!''

वेशीवर हल्ली डुक्करही
फारसे दिसत नाहीत.
विचारल्यावर एक स्वच्छ डुक्कर म्हणाला,
''उकिरडे खूप वाढलेत हल्ली,
फुंकणं हल्ली आमच्या शक्तीबाहेरचं झालंय''

चौकाचौकात हल्ली लत भरल्यासारखी
कुत्री बसलेली दिसतात
विचारल्यावर एक कृश कुत्रा म्हणाला,
''राजप्रतिनिधीच कुत्र्यांसारखे भांडतात
बाकी आमच्या इमानाला विचारतं कोण हल्ली?''

गावाबाहेरच्या उजाड माळरानावर
हल्ली गिधाडे ध्यानस्थ बसलेली दिसतात.
विचारल्यावर एका व्रतस्थ गिधाडानं सांगितलं,
''आम्ही आता वानप्रस्थी झाला आहोत.
मानवी गिधाडे बरीच सक्रीय आहेत.''

गाढवांनो घोड्यांसोबत हताशपणे एकत्र
बसलेलं मी हल्ली पाहतो
विचारल्यावर एक घोडा हिंदकाळत बोलला,
''आमच्या दोन्ही जमाती हल्ली बदनाम होतात
माणसं आमच्या भूमिकांची अदलाबदल करताहेत''

रक्तपिपासू पिसवा हल्ली रक्ताविना
पांढ्याफटक पडलेल्या दिसल्या
विचारल्यावर काही पिसवा आक्रंदल्या
''श्रीमंतांचं रक्त हल्ली अशुद्ध झालंय
गरिबांचं सारं रक्त व्यवस्थेने शोषलंय''

प्राण्यांना आणि पक्ष्यांना हल्ली बदनाम करीत
माणूसच पूर्ण हैवान झालाय.
पृथ्वीचं संतुलन बिघडत चाललंय नि
'माणूस' नावाची जमात वाढत चाललीय

- डॉ. गिरीश प. जाखोटिया

## साभार पोच

**लौकिकाकडून अलौकिकाकडे...**
**नर्मदे हर SSS...**
**(नर्मदा परिक्रमा)**

* * *

**: लेखिका :**
श्रीमती साधना वसंत मराठे
'वसंत', पाटील कॉलनी,
लेन नं.३, कॉलेज रोड,
नाशिक ४२२००५

**: दूरध्वनी :**
९८२२०४६९९२

* * *

**: प्रकाशक :**
श्री. संदीप मराठे

* * *

**: अक्षरजुळणी :**
सौ. स्वप्ना संदीप मराठे

* * *

**: मुखपृष्ठ :**
नितीन वसंत मराठे

* * *

**: मुद्रक :**
नितीन वसंत मराठे

* * *

**: मुद्रणसाहाय्य :**
सौ. अस्मिता नितीन मराठे

*** सुगरणीचा सल्ला ***

**आले व लसूण यांचे वाटण करताना त्यात थोडे मीठ व गोडतेल घालावे, रंग काळा पडत नाही.**

# संन्याशाची करामत (पर्यावरविषयी लेख)

**श्री.मधुसूदन प्रभाकर विद्वांस, कर्जत**

एक संन्यासी रस्त्याने चालला होता जाताना तो नुसता चालत नव्हता तर आजूबाजूच्या परिसराचे निरीक्षणही करत होता. इतक्यात त्याची नजर जवळच्या टेकडीकडे गेली. व त्याला खूप आश्चर्य व वाईटही वाटलं, कारण ती टेकडी उघडीबोडकी होती. एकही झाड त्या टेकडीवर नव्हते. अगदी करवंदीची जाळीही नव्हती.

एवढी मोठी टेकडी आणि अशी ओसाड, त्याने मन गलबलले. त्याने मनाशी निश्चय केला. तो टेकडीजवळ आला, निरीक्षण केले. दगडधोंडे व माती याशिवाय काही नव्हते.

पावसाळा आला. त्याने बरीच रोपे गोळा केली. त्यात आंबा, चिंच, फणस, बोरं, मोह अशी नाना प्रकारची रोपे होती. तसेच काही फुलझाडेही होती. ती रोपे त्याने टेकडीवर व्यवस्थित लावली. त्यांची मुलाप्रमाणे काळजी घेऊ लागला. तिथेच त्याने राहण्यासाठी छोटीशी झोपडीही बांधली. सकाळी एकदा भिक्षांदेही झाली की दिवसभर झाडे आणि तो, शेजारच्या गावातील लोक यायचे व हा कोण वेडा पीर इथे आला आहे म्हणून त्याची चेष्टा करायचे. पण हा त्यांच्याकडे पाहून फक्त हसायचा.

हळूहळू रोपे मोठी होऊ लागली. टेकडी हिरवीगार दिसू लागली. झाडामुळे तिथे पक्षी येऊ लागले. त्यांची किलबिल ऐकून संन्यासी तृप्त होत असे. लोकांनाही हा फरक जाणवला. चर्चा होऊ लागली. लोक तिथे येऊन बसू लाले. गप्पागोष्टी करू लागले. संन्यासी त्यांना कथा ऐकवू लागला. प्रवचन करू लागला. लोकांना ते बरे वाटू लागले नव्हे वेडच लागले.

मन संन्याशाने आपल्या पोतडीतले अस्त्र बाहेर काढले. तो लोकांना वनस्पतीचे महत्त्व सांगू लागला. लोकांना ते पटू लागले. त्यांना फक्त तोडायचीच सवय होती, पण आता त्यांचे विचार बदलले. त्यांनीही परिसरात नवीन झाडे लावली. त्यांची काळजी घेऊ लागले. गाव हिरवंगार दिसू लागलं. गुरांना खाद्य, जळणाला लाकूड मिळू लागले. मुलांना निरनिराळी फळे मिळू लागली. झाडामुळे उकाडा कमी झाला. जलसाठा वाढला. दिवसभर रानातून लाकडे आणण्याचे कष्ट बंद झाले. संन्याशाने त्यांना एक महत्त्वाची सूचना केली होती फांदी तोडा पण झाड तोडू नका. आणि लोक ती सूचना पाळत होते.

संन्यासी त्यांचा देवच बनला. गावातील बायका त्याला न सांगता जेवण पाठवू लागल्या. पण तो म्हणायचा बायांनो, मी संन्यासी! कशाला आणता हे सर्व?

यापेक्षा मी सांगतो ते लक्षात ठेवा. दरवर्षी झाडे लावा. त्यांची नीट काळजी घ्या. उगाच तोडू नका. फांद्या तोडल्या तर त्या पुन्हा फुटतात. जळणाला लाकूड मिळते. झाडाचे आयुष्य वाढते. फुलझाडे लावा. देवाला फुले मिळतील. मधमाशांना मध मिळेल. उगाच कोणी झाडे तोडू लागला तर त्याला अडवा. समजावून सांगा मग हीच झाडे तुम्हाला सुखी ठेवतील. औषधी वनस्पती लावा. त्यामुळे शरीर सदृढ राहील.

लोकांना ते पटले. त्याच्या उपदेशाप्रमाणे ते वागू लागले. आजूबाजूच्या गावातही जागृती झाली.

आता संन्यासी म्हातारा झाला होता, पण गाव त्याची काळजी घेई. एक दिवस संन्याशाने जगाचा निरोप घेतला. सर्व गाव हळहळला. सन्मानाने त्याला निरोप दिला. आजही लोक त्याच्या समाधीचे दर्शन घेतल्याशिवाय जेवत नाहीत. त्याने सांगितल्याप्रमाणे वागतात, म्हणतात आम्हाला देव भेटला.

तुम्ही कधी त्या गावाला जाल तर जरूर टेकडीवर जा. समाधीचे दर्शन घ्या. गावकऱ्यांना भेटा. तेच तुम्हाला सांगतील की तो आमचा देव होता. तुम्हालाही प्रेरणा मिळेल. धन्य तो संन्यासी!

**-श्री. मधुसूदन प्रभाकर विद्वांस**
ऋषीकेश सोसायटी, कचेरी रोड
कर्जत (रायगड) ४१०२०१
फोन : ९९२१९८४४०८

## वाचकांचा पत्रव्यवहार

सर्वांत वाईट म्हणजे कै. भाऊसाहेबांच्या दु:खद निधनाची बातमी वाचून सुन्न झालो. प्रतिष्ठानच्या सभा व कुलवृत्तांताच्या निमित्ताने कित्येक वेळा त्यांच्याशी भेटी आणि बोलण्याचा योग आला व पुष्कळ काही त्यांच्याकडून शिकायला मिळाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. त्यांच्या कुटुंबीयांना कै. भाऊसाहेब गेल्याचे दु:ख सहन करण्याचे धैर्य मिळावे ही ईश्वरचरणी प्रार्थना!

बऱ्याच अडचणीतूनही प्रतिष्ठानचे कार्य कार्यकारिणीच्या उत्साही सभासदांमुळे चालू आहे. याचा आनंद आहे.

२५ डिसेंबरला कुलसंमेलनला हजर राहण्याचा प्रयत्न नक्कीच करेन. सर्व सभासदांना नमस्कार व शुभेच्छा!

**- डॉ. सुरेंद्रनाथ ग. मराठे,** सी-४७, सुयोग आदित्य रेसिडन्सी, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७



## मराठ्यांच्या माहेरवाशीचे यश : सौ. देवयानी दीक्षित
### (चक्रदेवांची माहेरवाशीण, पृ.७३२)

सौ. देवयानी दीक्षित यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण 'पुणे भारत गायन समाज' शनिपार, पुणे या संस्थेत झाले. 'संगीत विशारद' ही परिक्षा हा संस्थेतर्फे झाली. पुढे त्यांनी एस.एन.डी.टी या संस्थेतून संगीतात एम.ए. ही पदवी मिळवली.

या संगीत प्रवासात त्यांना श्रेष्ठ गायिका सौ. शैलाताई दातार आणि सुधीर दातार यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. आणि अजूनही त्यांच्याकडेच शिक्षण चालू आहे.

मुंबईला त्या राहात असताना श्री. लालजी देसाई यांचे नाट्यसंगीताकरिता मार्गदर्शन लाभले. अनेक लहान मोठ्या संगीतस्पर्धेतून त्यांना बक्षीसे मिळाली आहेत.

सांगलीच्या आण्णासाहेब कराळे गायनस्पर्धेत त्यांना नाट्यसंगीत या विभागाचे प्रथम पारितोषिक (फिरता चषक) मिळाले होते.

'पुणे भारत गायन समाज' या संस्थेत 'बालगंधर्व शास्त्रीय नाट्यसंगीत' स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले होते.

'गानवर्धन' या संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी निवड झाली होती.

या वर्षीच्या मराठे प्रतिष्ठानच्या २५ डिसेंबरला होणाऱ्या स्नेहसंमेलनामध्ये त्या त्यांचे गायन सादर करणार आहे. ही त्यांना अभिमानाची गोष्ट वाटते.

मराठे प्रतिष्ठानद्वारा सौ. देवयानी (चक्रदेव)दीक्षित यांचे हार्दिक अभिनंदन!

मराठे प्रतिष्ठानचे सदस्य श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांच्या त्या सुकन्या आहेत.

## वाचकांचा पत्रव्यवहार

सप्टेंबरचा हितगुज अंक आवडला. त्यात मानसन्मानमध्ये श्रीशंकर दिग्विजयचा उल्लेख आवडला. धन्यवाद.

कह. भाऊसाहेबांची पत्रे खूप भावतात. माझा त्यांचा पुष्कळ घरोबा होता. माझ्या एवढ्या आयुष्यात अमेरिकेतून एकमेव फोन आला तो भाऊसाहेबांचा. अशी आपुलकी तशी दुर्मीळ असते.

२५ सप्टेंबरला वडिलांची तीथ असल्यामुळे वार्षिक सभेला येता येत नाही. तरी प्रयत्न करतो.

२५डिसेंबरच्या पुण्यातील संमेलनाला वेळ आहे त्यासाठी प्रवेश शुल्क नीलांबरीताईंकडे पाठवतो. शंभर सदस्यांची अट आहे.

पुष्कळ दिवसांची आगाशीला स्थानिक मेळावा घेण्याची इच्छा आहे. पण ते जमत नाही. काही पत्रे पाठवून प्रयत्न केले, पण साधे उत्तरही मिळाले नाही. संपर्क कमी झाला. केवळ हितगुज वरून संस्थेचे अस्तित्व कळते. याचे सगळे श्रेय आपले आहे. नव्या दमाचे तरुण तरुणी पुढे आल्याशिवाय काम वाढणार नाही.

सध्या श्री शंकर दिग्विजय भेट योजना राबवीत आहे. आपण हितगुज्मध्ये निवेदन दिले चांगला प्रतिसाद मिळाला. मराठे मंडळी मात्र उदासीन वाटली. सभेला शुभेच्छा

**- ज. गो. मराठे (पृ.४१७),** आगाशी

## ☺ हसरे हितगुज ☺

मी तुझं नाव वाळून लिहिलं..... ते वाहून गेलं.
मी तुझं नाव हवेत लिहिलं..... ते उडून गेलं.
मी तुझं नाव ह्दयात कोरलं..... मला हार्टअ‍ॅटॅक आला.

दिल जलता है, पर दिया कहाँसे लगाये।

ज्यांना शक्य असतं, ते करतात
ज्यांना जमत नाही, ते शिकवतात

# तव स्मरण सतत स्फूर्तीदायी घडो



## स्वर्गीय आप्पासाहेब मराठे

## तथा

## कै. सखाराम पुरुषोत्तम मराठे (पृ. ३९९)

**जन्म : १८ जून १९११** **निर्वाण : २८ ऑगस्ट, १९६९**

## मराठे प्रतिष्ठान

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी : ०२२-२४३०२४५३

## कै. आप्पासाहेब मराठे यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

# प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप
ऑफ कंपनीज्
बिल्डर अँड डेव्हलपर्स

## आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!

**BOOK POST**

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.


पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.marathepratishthan.org